# आश्रमशाळांचे वास्तव

आधुनिक गुरुकूलात घेतले जात आहेत

*एकलव्यांचे अंगठे...!*











श्रमजीवी संघटना

समर्थन

# आश्रमशाळांचे वास्तव

आधुनिक गुरुकुलात घेतले जात आहेत

## एकलव्यांचे अंगठे...!

श्रमजीवी संघटना

समर्थन

**प्रकाशित**

# आश्रमशाळा-वसतिगृह :
# शैक्षणिक कत्तलखाने

भिल्लाचे पोर म्हणून एकलव्याला महाभारत काळामध्ये द्रोणाचार्यांनी शिक्षणाचा अधिकार नाकारला. शिक्षणाचा अधिकार हा केवळ काही विशिष्ट समुदायापुरता मर्यादित होता. आपल्याकडच्या सरंजामी व्यवस्थेने, चातुर्वर्ण्य व्यवस्थेने शिक्षण मूठभरांसाठी मर्यादित ठेवले आणि शिक्षण सर्वसामान्यांपर्यंत पोहोचू दिले नाही. विशेषत: समाजातला कष्टकरी, श्रमणारा वर्ग हा गावकुसाबाहेरचा वर्ग होता आणि या गावकुसाबाहेरील जंगलाच्या दऱ्याखोऱ्यातून राहणारा आदिवासी वर्ग हा शिक्षणाच्या प्रवाहापासून कोसो दूर राहिला.

या सर्व पार्श्वभूमीवर भारतीय स्वातंत्र्यानंतर भारताचे संविधान अस्तित्वात आले. या संविधानाने सर्वांना समानतेचा अधिकार दिला. अलिकडच्या काळामध्ये जगण्याचा मूलभूत हक्कामध्ये बदल झाला. आणि त्यात शिक्षणाचा हक्क समाविष्ट झाला. भारतीय संविधानाच्या मार्गदर्शक तत्त्वाप्रमाणे अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती -जमाती याचे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक  विशेष हितसंवर्धन करण्याची जबाबदारी संविधानाने राज्यावर टाकली. राज्य याचा अर्थ कायदे करणारे - कायदे मंडळ, अंमलबजावणी करणारी, कार्यकारी यंत्रणा म्हणजे सरकार आणि न्यायपालिका या तिघांवर ही जबाबदारी भारतीय संविधानाने टाकली. आणि एक मूलभूत ढाचा बदलण्याचा, हा संपूर्ण समाजरचनेला बदलण्याचे एक स्वप्न भारतीय संविधानाने पाहिले, शिक्षणाचा प्रवाह हा मूठभराकडून बहुजनांकडे वळण्यास सुरुवात झाली. मात्र आजही आपण पाहिलं तर हा दऱ्याखोऱ्यातील आदिवासी समाज आहे तो आजही महाभारताच्या काळासारखाच आधुनिक द्रोणाचार्यांच्या कात्रीत सापडला आहे. राज्यामध्ये विशेषत: आदिवासी क्षेत्रामध्ये ही लोकसंख्या विरळ असल्यामुळे भौगोलिक अंतर खूप आहे. म्हणून जे निकष प्राथमिक शिक्षणासाठी ठरविले की, ५वी पर्यंत शाळा  जी आहे ती १ कि. मी. च्या आत असेल, ३ कि.मी पर्यंत ८वी पर्यंतची शाळा असेल, आणि ५ किमीच्या  आत माध्यमिक शाळा असेल हे निकष आजही आदिवासी विभागामध्ये  पूर्णपणे पाळले गेलेले नाहीत. अनेक ठिकाणी ४५-४५ किमी. अंतरावर सुद्धा शाळा नाहीत. मुंबई शहरापासून जवळच असलेल्या जव्हार-मोखाड्यामध्ये सुद्धा ४०-४५ किमी पर्यंतही माध्यमिक शाळा नाहीत हे आज वास्तव आहे. अशा अवस्थेमध्ये जी आदिवासीची पहिली पिढी आहे ती आता शिकायला लागली आहे. खरे म्हणजे स्वातंत्र्याच्या १० वर्षांनंतर सर्वांना शिक्षण मिळणं अभिप्रेत होते. आता ७ दशकं होतील तरी देखील शिक्षणाची गंगा, शिक्षणाचा प्रकाश हा आदिवासीपर्यंत पोहचलेला नाही.

माध्यमिक शाळा दूर असल्याने स्वाभाविकपणे ज्या आश्रमशाळा निर्माण करण्यात आल्या. ज्या आश्रमशाळांची निर्मिती सुरुवातीला महाराष्ट्रामध्ये सुरू झाली विशेषत: वर्ष १९५३-५४ मध्ये महाराष्ट्रामध्ये विशेषत: डहाणू सारख्या भागामध्ये भिसे गुरुजींनी याची सुरुवात करून दिली त्या आश्रमशाळांचे मॉडेल हे संपूर्ण देशभर स्वीकारले गेले आणि या आश्रमशाळांमधून आदिवासी मुले शिकतील, ही गुरुकुलाच्या धर्तीवरची कल्पना होती, जी आदर्शवादी आणि प्रत्यक्ष अंमलात येणारी कल्पना होती. आज या आश्रमशाळाच्यामध्ये मुलं-मुली शिकतील आणि आदिवासींची लोकसंख्या ही मोठ्या प्रमाणात शिक्षित होऊ शकेल या दृष्टीने आपण वाटचाल सुरू केली. मात्र आजची आश्रमशाळांची  परिस्थिती जर आपण पाहिली तर ५०-७० हजार आदिवासी लोकसंख्या असणाऱ्या सधन क्षेत्रामध्ये आश्रमशाळा सुरू करण्याचा मानस सरकारने जो केला, त्या दृष्टीने ५५४ शासकीय आणि ५५५ अनुदानित आश्रमशाळा जवळपास ११०९ आश्रमशाळा या आपल्या राज्यामध्ये निरनिराळ्या ठिकाणी सुरू करण्यात आल्या. या आश्रमशाळांची एकूण परिस्थिती जी आहे ती परिस्थिती आताच्या बुलढाण्याच्या पार्श्वभूमीवर फार प्रकर्षाने समोर आली आहे. एकाच आश्रमशाळेत १०-

१० मुलींच्यावर सातत्याने बलात्कार होतात आणि ही घटना दबून राहते. अनेक आश्रमशाळांमध्ये अनेक शेकड्यात मुले-मुली मरण्याचे प्रमाण महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक आहे. हे सर्वात खेदजनक आहे. चिंताजनक आहे. आणि उद्वेगजनक आहे. त्यामुळे आज या शाळांची अवस्था ही कोंडवाड्यासारखी आहे. या सर्व पार्श्वभूमीवर श्रमजीवी संघटनेच्या एकूण २५ प्रमुख कार्यकर्त्यांनी पाच टीम करून संपूर्ण पालघर जिल्ह्यातील आश्रमशाळांची माहिती घेतली आणि या पालघर जिल्ह्यातील आश्रमशाळा एकूण १३० आहेत. त्यापैकी ६५ आश्रमशाळा या शासकीय आहेत, अनुदानित ३८ आहेत. त्यापैकी एकूण ४७ शासकीय आश्रमशाळा तसेच १३ अनुदानित आश्रमशाळा अशा एकूण ६० आश्रमशाळांची माहिती ही 'श्रमजीवी संघटने'ने पाहणी करून जमा केली आणि आज 'समर्थन' तर्फे त्याचे अहवालामध्ये रुपांतर होत आहे.

या ठिकाणी आढळून आलेली जी वस्तुस्थिती आहे ती वस्तुस्थिती विदारक आहे. विशेषत: सन्मानाने जगण्याचा अधिकार भारतात राज्य घटनेच्या अनुच्छेद २१ ने दिलेला आहे. हा मूलभूत अधिकार जर सर्वांना दिलेला असेल तर त्या सन्मानाने जगण्याच्या अधिकारामध्ये विशेषत: मुलींचा सन्मान ही प्राधान्याची गोष्ट आहे. आढळून आलेल्या आश्रमशाळामध्ये ज्या ठिकाणी शौचालये व स्नानगृहे आहेत ती जवळपास कुठेही वापरात नाहीत अशी परिस्थिती आहे. कुठे दरवाजे मोडलेले, कुठे शौच कुपे खराब झालेली आहेत. बहुसंख्य ठिकाणी पाण्याची व्यवस्था नाही. त्यामुळे मुलींनाही जवळपास सर्वच ठिकाणी विहिरीवर, ओढ्या-नाल्यावर आंघोळीसाठी जावे लागते. तर काही ठिकाणी मोठ्या शेडसारखी स्नानगृहे तयार केलेली आहेत, शौचालयासाठी त्यांना बाहेर जावे लागते. हा खरं म्हणजे भारतीय संविधानाने सन्मानाने मूलभूत जगण्याचा अधिकाराचा सर्रास भंग आहे. संविधानाची पायमल्ली तुडवण्यासारखे आहे. ते देखील शासनाने करावे हे फार उद्वेगजनक आहे. या दृष्टीने श्रमजीवी संघटनेने आंदोलन देखील जाहीर केले आहे. १ एप्रिल पर्यंत जर शौचालय आणि स्नानगृह पाण्यासह सुसज्ज केली नाही तर भारतीय संविधानाचा भंग शासनाने केला म्हणून संविधानाने दिलेल्या सर्व मार्गांचा वापर करून जे जे काही आवश्यक आहे. ते संघटनेकडून केले जाईल. मग न्यायालयात जाण्यापासून ते रस्त्यावरचे आंदोलन करण्यापर्यंतच सर्व मार्ग हे श्रमजीवी संघटना वापरणार आहे. आज या निमित्ताने आश्रमशाळेतल्या जेवणाची परिस्थिती, आश्रमशाळेतील शिक्षकांची परिस्थिती, प्राथमिक शिक्षकांना १५ रुपये प्रति तास या पद्धतीने मिळत होते. यावर संघटनेने आवाज उठवल्यानंतर आता ते ७० रुपयांवर करण्यात आले आहेत. थोडा फार बदल या प्राथमिक शिक्षकांच्या वेठबिगारीमध्ये करण्यात आला परंतु कंत्राटी पद्धतीने जे सुरक्षा रक्षक आहेत त्यांना दिले जाणारे वेतन आणि प्रत्यक्ष कंत्राटदाराला मिळणारी रक्कम यात प्रचंड तफावत आहे. अनेक ठिकाणी प्रयोगशाळा आहेत, परंतु प्रयोगशाळेत सहाय्यक पाहिजेत, निरीक्षक पाहिजेत ते बहुतेक ठिकाणी नाहीत. काही ठिकाणी प्रयोगशाळेत सहाय्यक आहेत, परंतु प्रयोगशाळा नाही. जवळपास सर्वच शाळांमध्ये वाचनालय कुठेही आढळून आलेले नाही. मैदानाचीही वानवा जवळजवळ सर्वच ठिकाणी आहे. आश्रमशाळांना पुरेसे खेळाचे मैदान पाहिजे, खेळांची साधने पाहिजेत ती खेळाची साधने ही नाहीत. म्हणजे मूलभूत सुविधांच्याबाबत जर आपण पाहिले तर सगळीच वानवा आहे. तीच बाब जेवणाच्या बाबतीतही आहे. जिथे सेंट्रल किचन आहे त्या ठिकाणी ही परिस्थिती आता थोड्या फार प्रमाणात बदलेली आहे. तिथले जेवण समाधानकारक असल्याची माहिती मिळालेली आहे. परंतु ज्या ठिकाणी जेवण शिजवून दिले जाते ती व्यवस्था मात्र अत्यंत दारुण आहे. जनावरांना दिले जाणारे धान्य हे आपल्या आदिवासी मुलांना देण्यात यावे इतकी वाईट अवस्था या अन्नधान्याची आहे. विशेषत: निकषानुसार त्यांना जो सकस, पूरक आहार दिला गेला पाहिजे, त्याचे प्रमाण आणि दिला जाणारा प्रत्यक्ष जो आहार यात बरीच तफावत आहे. त्यात भाजीपाला दिला जात नाही, अंड्याची वानवा आहे. मुलांच्या पोटामध्ये त्यांची शारीरिक क्षमता वाढण्याकरीता जो सकस आहार गेला पाहिजे तो सकस आहार कमी दिला जातो. जी परिस्थिती अन्नधान्याची तिच रेनकोट, स्वेटर इ. साहित्याची आहे. दुसरी गोष्ट

पावसाळा संपल्यावर रेनकोट आले. आणि आमचे मंत्रीमहोदय 'अजून पावसाळा कुठे संपलाय' असे आपले अकलेचे तारे पाजळायला लागले. स्वेटरच्या बाबतीत तर २१०० रुपयांचे स्वेटर द्यायची तरतूद करण्यात आली. प्रत्यक्ष तो स्वेटर ४००-५००चा असेल आता ती रक्कम पालकांनी जमा करण्यावर धोरण आलेले आहे. ही निर्णयाची धरसोडवृत्ती आणि अंमलबजावणीतला भ्रष्टाचार याने संपूर्ण आश्रमशाळांची यंत्रणा पोखरली गेली आहे. शिक्षकांची वानवा आहे, अधिक्षक, स्त्री अधिक्षिका अनेक ठिकाणी नाहीत.

मुलीच्यांवर बलात्कार होण्याचे प्रमाण अधिक आहे कारण स्त्री अधिक्षिकाच नाही. पुरुष अधिक्षक अनेक ठिकाणी नाहीत. बहुतेक ठिकाणी निम्म्या पेक्षाही जास्त शिक्षकांची पदे रिक्त आहेत. जे रोजंदारी पद्धतीने भरले गेलेले आहेत, त्यांच्या गुणात्मक दर्जाबद्दल प्रश्न निर्माण झालेले आहेत.आणि त्यांच्या वेतनाबदलही प्रश्न निर्माण झालेले आहेत. आश्रमशाळांच्या इमारतीची अवस्था अत्यंत भयावह आहे. ही सर्व परिस्थिती पाहिली तर सरकारला या आश्रमशाळा पुढे चालवायच्या आहेत की नाही हा प्रश्न पडतो. विशेषत: भोजनाच्या वेळेचा जो प्रश्न आहे तो फार गंभीर प्रश्न आहे. की जे वेळापत्रक दिलेले आहे त्या वेळापत्रकाप्रमाणे सकाळी आठ वाजता एक नाश्ता आहे. दुपारी १२ वाजता जेवण आहे. मधल्या काळामध्ये २.४५ वाजता अल्पोपहार आहे. संध्याकाळी ६.३० ही जेवणाची वेळ आहे. संध्याकाळी ६.३०चे जेवण ते दुसऱ्या दिवशी सकाळी ८.०० वा. चा नाश्तात यामधले अंतर तब्बल १३½ तासांचे आहे. १३½ तासांचे अंतर आहारामध्ये असणे, पूरक व सकस आहार नसणे हे मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत घातक आहे. त्यामुळे हे वेळापत्रक गरजेची बाब झालेली आहे. त्यामध्ये पोषक आहार कसा मिळेल. कारण आहाराचा संबंध बुद्धीच्या वाढीशी देखील आहे. कुपोषणाचा परिणाम हा मुलांच्या बुद्धीवर देखील होतो. असे आढळून आलेले आहे.

**वसतिगृह** : राज्यातील वसतिगृहातील स्थितीही यापेक्षा फारशी वेगळी नाही. राज्यात २५००० विद्यार्थी उच्च शिक्षण घेण्यासाठी वसतिगृहाच्या प्रतिक्षेत आहेत. वसतिगृहांची क्षमता वाढविण्यासाठी मंत्री महदोय कशाची वाट पहात आहेत ? क्षमता न वाढवल्याने खुद्द मंत्र्यांच्या गावातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण सोडून मजूरी करावी लागत आहे. वाडा येथे मुलींच्या वसतिगृहाच्या इमारतीची क्षमता १२० आहे. मात्र मंजुरी केवळ ७५ ची आहे. गावातील वसतिगृहाची क्षमता कॅबिनेट मंत्री जर वाढवण्यास असमर्थ असतील तर मान. मंत्र्यांना त्याचा जाब त्यांना द्यावाच लागेल.

संगणकाबाबतीतही परिस्थिती तशीच आहे एकूण जर का पाहिले तर या आश्रमशाळांमध्ये तातडीने कालबद्ध कार्यक्रम ठरवून जर बदल केले नाहीत आपण तर आदिवासी मुलांचे भविष्य धोक्यात घालतो आहोत. विशेषत: आज जे स्पर्धेचे जे युग आहे या स्पर्धेच्या युगात मुलांना टिकायचे असेल तर त्याच्या पोटामध्ये आहार चांगला पाहिजे, त्यांना शिक्षणाच्या चांगल्या सुविधा पाहिजेत, सर्व प्रकारची साधने त्यांना उपलब्ध झाली पाहिजेत. तरच ते बाहेरच्या जगाशी स्पर्धा करू शकतील नाहीतर आजची ही जी विषमता आहे ती अधिक वाढेल. समाजव्यवस्था जी पूर्वी चातुर्वर्ण्यावर होती, तशीच आता आपण शिक्षणातून नवी चातुर्वर्ण्य व्यवस्था तयार करतो आहोत. शिक्षण व्यवस्थेतून आपण आदिवासी समाजावर मोठा अन्याय करतो आहोत. आणि या विषमतेला अधिक खतपाणी घालतो आहोत. या पुढच्या काळामध्ये आदिवासींच्या विकासासाठी कालबद्ध कार्यक्रम जर ठरविला, तर समित्या वगैरेही नेमण्याची आवश्यकता नाही. कारण अनेक समित्यांनी आजवर अनेकपद्धतीच्या शिफारशीचे अहवाल दिलेले आहेत. मात्र शिफारशींची अंमलबजावणी कधी आणि कोणी करायची, मात्र संदर्भातही प्रश्नचिन्हच आहे. आणि म्हणून या संदर्भामध्ये कालबद्ध कार्यक्रम ठरवून जर काही बदल घडवून आणले तरच आदिवासी मुलांना न्याय मिळेल अन्यथा या आदिवासी मुलांना पुन्हा एकदा आपल्या मूलभूत हक्कांच्या रक्षणाकरिता आपला मार्ग स्वत:च शोधावा लागेल हे निश्चित.

**- विवेक पंडित**

# ‘पालघर जिल्ह्यातील आश्रमशाळांचे वास्तव’

## आदिवासीबहुल पालघर जिल्हा :

सागरी-डोंगरी आणि नागरी क्षेत्र असलेल्या देशातील सर्वात मोठ्या ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन पालघर जिल्हा १ ऑगस्ट इ. स. २०१४ रोजी निर्मित करण्यात आलेला आहे. महाराष्ट्रातील ३६ वा जिल्हा म्हणून निर्माण झालेल्या जिल्ह्याचे मुख्यालय ‘पालघर’ शहरच आहे. पालघर हे ठाणे शहरापासून ५२.३ किमी व महाराष्ट्राची राजधानी मुंबईपासून ७४ किमी अंतरावर आहे. पालघर जिल्ह्याची एकूण लोकसंख्या २९,९०,११६ एवढी आहे. पालघर जिल्ह्यात आदिवासी लोकसंख्या ११,१८,००८ आहे. पालघर जिल्ह्यात एकूण ८ तालुके आहेत त्यामध्ये जव्हार, मोखाडा, तलासरी, वसई, विक्रमगड, पालघर, डहाणू आणि वाडा तालुक्यांचा समावेश आहे. त्यामध्ये एकूण १,००८ गावे व ३,८१८ पाडे आहेत. जिल्ह्यातील जव्हार, मोखाडा आणि तलासरी हे तीन तालुके १०० टक्के आदिवासीबहुल आहेत, तर पालघर, वसई, विक्रमगड आणि वाडा तालुक्यात आदिवासी आणि बिगर आदिवासी अशी संमिश्र लोकसंख्या आहे.

दोन वर्षापूर्वी जिल्ह्याचे विभाजन झाले, मात्र आजही येथे ५६ पैकी ३७ वेगवेगळ्या प्रकारची शासकीय विभागाची कार्यालये निर्माण झालेली नाहीत. शिक्षण, पुरवठा, अति महत्त्वाच्या असलेल्या आरोग्य विभागासह अनेक विभागाची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त आहेत. जिल्ह्यातील कुपोषणाचा प्रश्न गंभीर असतानाही शासन-प्रशासन मात्र याबाबत संवेदनशून्य आहे.

राज्यातील लोकसंख्येच्या बहुतांश वंचित व दुर्लक्षित घटक असणारे हे आदिवासी आहेत. भारतीय घटनेच्या कलम ४६ नुसार समाजाच्या दुर्बल घटकाच्या विशेषत: अनुसूचित जाती/जमाती यांच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक हितसंबंधाकडे विशेष लक्ष देऊन त्यांचा विकास करण्याकरिता आणि त्यांना सामाजिक अन्याय तसेच सर्व प्रकारच्या शोषणापासून संरक्षण देण्यास शासन कटिबध्द असणे अपेक्षित आहे. असे असतानाही शासन व प्रशासनाच्या उदासिनतेमुळे आज आदिवासी समाज सामाजिक, आर्थिक व शैक्षणिक घटकाबाबतीत आदिवासी समाज व उर्वरित समाज यात प्रचंड दरी राहिलेली आहे, जी सरकारी योजनांच्या अनेक योजना, कार्यक्रमानंतरही दुरावतच आहे. साक्षरता, दारिद्र्य, दरडोई उत्पन्न, आरोग्य या सर्वच पातळीवर आदिवासी समाज अंधारात चाचपडत आहे. गरिबी व भूकेने कुपोषणाला बळी पडत आहे.

## आश्रमशाळांचा इतिहास :

वर्ष १९५३-५४ मध्ये स्वयंसेवी संस्थांनी सादर केलेला १२ प्रस्तावांचा विचार करून सहाय्यक अनुदानतत्त्वावर शासनाने आश्रमशाळा सुरू करण्यास मान्यता दिली. महाराष्ट्र शासनाने वर्ष १९७१-७२ मध्ये स्वत: २० आश्रमशाळा विकसित करण्याचा तर पुढे वर्ष १९७२-७३ मध्ये ४० नवीन आश्रमशाळा शासनातर्फे चालविण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीस आश्रमशाळा योजना ही राज्याच्या शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखाली होती. मात्र वर्ष १९७५-७६ पासून ती समाज कल्याण विभागाकडे गेली व तद्नंतर वर्ष १९८४-८५ पासून आदिवासी विकास विभागाच्या नियंत्रणाखाली आली. महाराष्ट्र शासनाने सुमारे ५०,००० ते ७०,००० आदिवासी लोकसंख्या असलेल्या प्रत्येक सधन क्षेत्रामध्ये आश्रमशाळा सुरू करण्याचा कार्यक्रम ठरविलेला आहे.

## आश्रमशाळांची सद्यस्थिती :

राज्यात ५५४ शासकीय व ५५५ अनुदानित आश्रमशाळा अशा एकूण १,१०९ आश्रमशाळा आहेत. तर २०० आश्रमशाळा संलग्न कनिष्ठ महाविद्यालय आहेत. त्यातील बऱ्याच आश्रमशाळा आज मोडकळीस आलेल्या आहेत. वंचित समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या संधी उपलब्ध करून देणे हा आश्रमशाळांमागचा उद्देश आहे. मात्र याबाबत आदिवासी विद्यार्थी-विद्यार्थिनींना ज्या आश्रमशाळांतून शिक्षण पुरवले जाते, त्या आश्रमशाळांची, वसतिगृहांची दुरवस्था पाहता तिथे मिळणाऱ्या शिक्षणाची गुणवत्ता दिसून येते. पडके, गळणारे छप्पर, विद्यार्थिनींसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहे नसणे, संरक्षक भिंत नसणे, सडके अपुरे अन्न, पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष्य, फाटकी मळलेली अंथरुण-पांघरुण, आंघोळीसाठीही पाण्याची सोय नाही. या सर्व असुविधा दूर करण्यासाठी व मूलभूत सोयी सुविधा निर्माण करण्यासाठी शासनाला युद्ध पातळीवर कार्य करावे लागणार आहे.

## पालघर जिल्ह्यातील आश्रमशाळा :

पालघर जिल्ह्यात एकूण १०३ आश्रमशाळा आहेत. शासकीय आश्रमशाळांची संख्या ६५ आहे. अनुदानित आश्रमशाळांची संख्या ३८ आहे. 'समर्थन - श्रमजीवी संघटने'ने माहे ऑक्टोबर मध्ये संपूर्ण महिना पालघर जिल्ह्यातील ६० आश्रमशाळेचा सर्व्हे केला. ४७ शासकीय आश्रमशाळा व १३ अनुदानित आश्रमशाळांचे सर्वेक्षण करून माहिती संकलित केली. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची गैरसोय, आस्थापनाविषयक त्रुटी, सेवा-सुविधांचा लक्षणीय तुटवडा यातून आश्रमशाळांचे विदारक वास्तव समोर आले.

स्वातंत्र्य मिळून साडे सहा दशके उलटली तरी राज्यातल्या आदिवासी भागातील स्थिती बदललेली नाही. आजही जव्हार-मोखाडा मधील अनेक पाड्यांवर वीज, रस्ते, पाणी तसेच आरोग्याच्या मूलभूत सोयी पोहोचलेल्या नाहीत. मुंबईपासून अवघ्या १२० किलोमीटर वर असलेल्या जव्हार-मोखाडाची ही स्थिती असेल तर गोंदिया, यवतमाळ, गडचिरोली, चंद्रपूर, नंदूरबार इथल्या आदिवासींच्या गंभीर स्थितीची कल्पना येईल.

### पालघर जिल्ह्यातील आश्रमशाळा : मूलभूत माहिती

तक्ता क्र. १

| तालुका | शासकीय | अनुदानित | एकूण आश्रमशाळा | सर्वे केलेला शासकीय आश्रमशाळा | सर्वे केलेला अनुदानित आश्रमशाळा | सर्वे केलेला एकूण आश्रमशाळा |
|---|---|---|---|---|---|---|
| वाडा | ०६ | ०४ | १० | ०६ | ०३ | ०९ |
| वसई | ०४ | ०१ | ०५ | ०२ | ०१ | ०३ |
| विक्रमगड | ०६ | ०५ | ११ | ०५ | ०२ | ०७ |
| जव्हार | ११ | ०४ | १५ | ०८ | ०१ | ०९ |
| मोखाडा | ०७ | ०४ | ११ | ०४ | ०३ | ०७ |
| पालघर | १० | ०३ | १३ | ०६ | ०१ | ०७ |
| डहाणू | १३ | १३ | २६ | १० | ०० | १० |
| तलासरी | ०८ | ०४ | १२ | ०६ | ०२ | ०८ |
| **एकूण** | **६५** | **३८** | **१०३** | **४७** | **१३** | **६०** |

**राज्यातील आश्रमशाळा आणि विद्यार्थी संख्या :**

राज्यात एकूण १ हजार १०९ आश्रमशाळा असून त्यापैकी शासकीय आश्रमशाळा ५५२ व अनुदानित आश्रमशाळा ५५७ आहेत. शासकीय आश्रमशाळेमध्ये (इयत्ता १ ली ते १२ वी) १ लाख ८७ हजार २१६ विद्यार्थी शिक्षण घेत असून मुलींची संख्या ८४ हजार ४८४ आहे. (४५.१२%) तर अनुदानित आश्रमशाळांमध्ये (इयत्ता १ ली ते १२ वी) २ लाख १० हजार ८७४ विद्यार्थी शिक्षण घेत असून मुलींची संख्या ८२ हजार ७५० आहे. (३९.२४%).

**शासकीय आश्रमशाळांचा दिला जाणारा निधी व प्रत्येक विद्यार्थ्यांवर होणारा सरासरी खर्च:**

राज्यात ५४७ शासकीय आश्रमशाळा असून शासकीय आश्रमशाळेत १,८७,२१६ एकूण विद्यार्थी आहेत. वर्ष २०१४-१५ मध्ये ४७६ कोटी ७१ लाख रुपये एवढा निधी देण्यात आला होता. याचा अर्थ प्रत्येक विद्यार्थ्यावर सरासरी खर्च २५ हजार ४६३ रुपये केला गेला. वर्ष २०१५-१६ मध्ये सुधारित अंदाजानुसार हा सरासरी खर्च २७ हजार ८११ रुपये होणार आहे. तरी वर्ष २०१६-१७ चा अंदाजित खर्च सरासरी ३४ हजार १२ रुपये एवढा होईल.

**अनुदानित आश्रमशाळांचा दिला जाणारा निधी; प्रत्येक विद्यार्थ्यांवर होणारा सरासरी खर्च:**

राज्यात ५५६ अनुदानित आश्रमशाळा असून अनुदानित आश्रमशाळेतील विद्यार्थी २,१०,८७४ आहेत. वर्ष २०१४-१५ मध्ये ४५५ कोटी ६८ लाख रुपये एवढा निधी देण्यात आला होता. याचा अर्थ प्रत्येक विद्यार्थ्यांवर सरासरी २१ हजार ६०९ रुपये खर्च करण्यात आला. वर्ष २०१५-१६ मध्ये सुधारित अंदाजानुसार हा सरासरी खर्च २३ हजार रुपये आहे तर चालू वर्षी म्हणजे २०१६-१७ मध्ये २४ हजार ९७४ एवढी खर्चात वाढ होणार आहे.

## शिक्षण हक्क कायदा व आश्रमशाळा संहिता बासनातच!

**प्राथमिक शिक्षण :**

प्राथमिक शिक्षण खऱ्या अर्थाने शिक्षणाचा व विद्यार्थ्यांचा उज्ज्वल भवितव्याचा पाया आहे. शिक्षणाविषयी गोडी निर्माण करण्यासाठी तसेच शिक्षणामध्ये प्रगती साधण्यासाठी प्राथमिक शिक्षणाचा वाटा महत्त्वाचा असतो. त्यामुळे प्राथमिक शिक्षणाचा दर्जा गुणवत्तापूर्ण असणे महत्त्वाचे आहे. पालघर जिल्ह्यातील आश्रमशाळेत मात्र प्राथमिक शिक्षणाचा पुरता बोजवारा उडालेला दिसतो आहे.

**माध्यमिक शिक्षण :**

प्राथमिक शिक्षणातच मुलांचा पाया कच्चा राहिल्यामुळे तसेच माध्यमिक शिक्षणाच्या सुविधांचाही तुलनेने अभाव असल्यामुळे निकषानुसार ३५ विद्यार्थी एका वर्गात आवश्यक असतानाही एकेका वर्गात १००-१२० पर्यंत तिप्पट मुले असल्याची दिसून आलेली आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक प्रगती गाठताना उणिवा दिसून येतात.

**उच्च माध्यमिक शिक्षण:**

उच्च माध्यमिक शिक्षण घेताना विद्यार्थ्यांचा खऱ्या अर्थाने कस लागतो. वर्गसंख्या व शिक्षकांची प्रचंड कमतरता या सोबतच प्रयोगशाळा; संगणक प्रशिक्षण; वाचनालय याबाबतीत पालघर जिल्ह्यातील आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक युगात टिकण्यासाठी आवश्यक त्या तयारीचा अभाव दिसतो. परिणामी येणाऱ्या न्यूनगंडाच्या भावनेमुळे हा विद्यार्थी बाहेरील जगात टिकाव धरण्यासाठी सक्षम ठरत नाही.

## विद्यार्थी संख्येच्या प्रमाणात वर्गखोल्या अपुऱ्या:

शिक्षणाचा दर्जा व गुणवत्ता टिकवण्यासाठी शाळेमध्ये असलेले शिक्षक-विद्यार्थी प्रमाण महत्त्वाचे आहे. तसेच सुसज्ज अशा वर्गखोल्याही प्रत्येक विद्यार्थ्यावर वैयक्तिक लक्ष देण्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या आहेत. शिक्षण हक्क कायद्यानुसार इयत्ता १ली ते ५वी प्राथमिक शिक्षणासाठी प्रती ३० विद्यार्थ्यांमागे १ वर्गखोली, इयत्ता ६ वी ते ८ वी माध्यमिक शिक्षणासाठी ३५ विद्यार्थ्यांमागे १ वर्गखोली तर इयत्ता ९ वी ते १२ वी या उच्च माध्यमिक शिक्षणासाठी ४० विद्यार्थ्यांमागे १ वर्गखोली असणे कायद्याने बंधनकारक आहे. या निकषानुसार पालघर जिल्ह्यातील सर्वच्या सर्व आश्रमशाळांमध्ये अतिरिक्त विद्यार्थ्यांचे प्रमाण ३ ते ४ पटीने जास्त आहे.

### शिक्षण - इयत्ता १ ली ते १२वी

तक्ता क्र. २

| विद्यार्थी-इयत्ता | पालघर | वाडा | वसई | विक्रमगड | जव्हार | तलासरी | डहाणू | मोखाडा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ली ते ५वी | १००१ | १५५१ | ४१० | १५०१ | १७६४ | १७०९ | १७८७ | ११७४ | **१०८९७** |
| ६ ते ८वी | ११४९ | १७२० | ३३३ | १३५२ | १५५५ | १५०८ | १६३५ | १२०० | **१०४५२** |
| ९वी ते १२वी | ५८७ | २२४० | ४९७ | २१४७ | २३०४ | १६६४ | १५६३ | २६०६ | **१३६०८** |
| **एकूण विद्यार्थी** | **२७३७** | **५५११** | **१२४०** | **५०००** | **५६२३** | **४८८१** | **४९८५** | **४९८०** | **३४९५७** |
| अतिरिक्त विद्यार्थी | ९२४ | २२७० | २८३ | २३२८ | २३८० | २३५४ | १९८५ | १८७७ | **१४४०१** |
| प्रत्यक्ष शिक्षक | ५९ | १०३ | २६ | ७५ | ७२ | ५४ | ६५ | ९१ | **५४५** |
| आवश्यकतेपेक्षा कमी शिक्षक | १० | ३५ | ५ | ५० | ६९ | ६८ | ६० | ३३ | **३३०** |
| प्रत्यक्ष वर्गखोल्या | ३७ | ८८ | ७ | ४६ | ९२ | ५० | ४८ | ७४ | **४४२** |
| आवश्यकतेपेक्षा कमी वर्गखोल्या | २९ | ७३ | ८ | ६६ | ६० | ६८ | ५८ | ५५ | **४१७** |

# आश्रमशाळेत शिक्षक व शिक्षकेतर पदांची वानवा

## आता ज्ञानदानही कंत्राटावर!

महाराष्ट्रात एकूण शासकीय व अनुदानित अशा मिळून १ हजार १०९ आश्रमशाळा कार्यरत आहेत. या आश्रमशाळेतून आज रोजी ३ लाख ९८ हजार ९० इतके विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यापैकी मुलींची संख्या १ लाख ६७ हजार (४२%) इतकी आहे. यामध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी अशा आवश्यक पदांपेक्षा कितीतरी पदे आज रिक्त आहेत. श्रमजीवी संघटनेच्या प्रतिनिधींनी पालघर जिल्ह्यातील ४७ शासकीय तसेच १३ अनुदानित आश्रमशाळेची पाहणी केली. यामध्ये सर्वच आश्रमशाळा या ग्रामीण भागात आहेत. या आश्रमशाळांचा दर्जा टिकवून ठेवायचा असेल व सर्वसाधारण मुलांसोबत या मुलांची शैक्षणिक गुणवत्ता आणायची असेल तर निपुण प्रशिक्षित शिक्षक आश्रमशाळांमध्ये नियुक्त करणे गरजेचे आहे. प्राथमिक ते उच्च माध्यमिक शाळांमध्ये ७१५ शिक्षक मंजूर प्रत्यक्षात असताना फक्त ५४५ शिक्षक आहेत. त्यापैकी तब्बल १११ शिक्षक कंत्राटी पद्धतीने काम करतात. ही पदे सुद्धा तासिका पद्धतीने भरलेली असून त्यांना वेतन १८०० ते २२०० रुपये दिले जाते. अशा शिक्षकांकडून ते चांगले शिकवतील अशी अपेक्षा आपण कशी करणार? जे शिक्षक शिकवत आहेत त्यांना वर्षानुवर्षे प्रशिक्षण दिले गेलेले नाही. त्यांच्याकडून अद्ययावत व नाविन्यपूर्ण शिक्षण देण्याची अपेक्षा कशी करायची? ज्ञानाच्या क्षेत्रात होणाऱ्या बदलाशी स्वत:चे समायोजन करण्याची ताकद ते स्वत:मध्ये आणि परिणामी विद्यार्थ्यांमध्ये कशी आणणार?

आश्रमशाळेत भरती झालेल्या विद्यार्थ्यांचे शिक्षण कार्यक्षमरीतीने आणि प्रभावीपणे होण्यास शिक्षक हा सर्वोपरी जबाबदार असतो. विद्यार्थी घडविण्याचे, त्यांना एक सुजाण नागरिक बनविण्याची जबाबदारी शिक्षकांवर असते. विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छता, शिस्त जोपासण्यास शिक्षक जबाबदार असतो. सर्वेक्षण केलेल्या आश्रमशाळांचा विचार करता विद्यार्थी - शिक्षक गुणोत्तरानुसार पालघर जिल्ह्यातील या ६० आश्रमशाळांमध्ये ८७५ शिक्षकांची आवश्यकता आहे.

तक्ता क्र. ३

| पद | पालघर | वाडा | वसई | विक्रमगड | तलासरी | जव्हार | डहाणू | मोखाडा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| शिक्षक मंजूर पदे | ७३ | ११२ | ३३ | ९५ | ८६ | १०७ | १०१ | १०८ | **७१५** |
| प्रत्यक्ष शिक्षक | ५९ | १०३ | २६ | ७५ | ५४ | ७२ | ६५ | ९१ | **५४५** |
| शिक्षक रिक्त पदे | ७ | ११ | ६ | ४ | ४ | १५ | १५ | ५ | **६७** |
| शिक्षक कंत्राटी पदे | ८ | ५ | १ | १६ | २८ | २० | २१ | १२ | **१११** |
| प्रत्यक्ष विद्यार्थी | २७३७ | ५५११ | १२४० | ५००० | ५६२३ | ४८८१ | ४९८५ | ४९८० | **३४९५७** |
| शिक्षक आवश्यकतेपेक्षा कमी | १० | ३५ | ५ | ५० | ६९ | ६८ | ६० | ३३ | **३३०** |

## अत्यल्प मानधनावर काम करणाऱ्या कंत्राटी शिक्षकांकडून गुणवत्तापूर्ण शिक्षणाची अपेक्षा फोल!

पाहणी केलेल्या ६० आश्रमशाळांचा आढावा घेतला असता शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची १,५८३ पदे मंजूर आहेत त्यापैकी ५१७ पदे रिक्त आहेत. दि. २३ डिसेंबर २००४ च्या शासन निर्णयानुसार आश्रमशाळांमध्ये अर्धवेळ, घड्याळी तासांवर नेमलेल्या शिक्षक पदावरील कर्मचाऱ्यांचे मानधन १५ रु. प्रति घड्याळी तास करण्यात आले आहे. एवढ्या कमी मानधनावर मुलांना शिकवण्याचे काम करावे लागत असेल तर शिकविण्याची इच्छाशक्ती त्या शिक्षकामध्ये कशी निर्माण होणार? कंत्राटी शिक्षकांना घड्याळी तासावर केवळ १५ रुपये मानधन देणे हा ज्ञानदानाचे मोलाचे काम करणाऱ्या समाजातील एका महत्त्वाच्या घटकाचा अपमान आहे असेच म्हणावे लागेल.

## उद्याच्या स्पर्धात्मक युगातील आदिवासी विद्यार्थी घडविण्याची जबाबदारी असणाऱ्या शिक्षकांचे मानधन दर्शविणारा तक्ता

तक्ता क्र. ४

| | २३ डिसेंबर २००४ | १ डिसेंबर २००६ |
|---|---|---|
| **१)उच्च माध्यमिक स्तर** | | |
| अ) पूर्ण अर्हताधारक शिक्षक | रुपये २०/- प्रति घड्याळी तास | रुपये ७२/- प्रति घड्याळी तास |
| ब) अपूर्ण अर्हताधारक शिक्षक | रुपये ३५/- प्रति घड्याळी तास | रुपये ५४/- प्रति घड्याळी तास |
| **२) माध्यमिक स्तर** | | |
| अ) प्रशिक्षित पदवीधर शिक्षक | रुपये १५/- प्रति घड्याळी तास | रुपये ५४/- प्रति घड्याळी तास |
| ब) अप्रशिक्षित पदवीधर शिक्षक | रुपये १२/- प्रति घड्याळी तास | रुपये ४३/- प्रति घड्याळी तास |
| **३) प्राथमिक स्तर** | | |
| अ) प्रशिक्षित शिक्षक | रुपये १५/- प्रति घड्याळी तास | रुपये १५/- प्रति घड्याळी तास |
| ब) अप्रशिक्षित शिक्षक | रुपये १२/- प्रति घड्याळी तास | रुपये १२/- प्रति घड्याळी तास |

## मुख्याध्यापकाविना आश्रमशाळा वाऱ्यावर!

आश्रमशाळेतील मुख्याध्यापक म्हणजे त्या आश्रमशाळेचा मेंदूच आहे. शिक्षक, विद्यार्थी यांना प्रोत्साहीत करणे व त्यांच्याकडून गुणवत्तापूर्ण कामे करून घेणे व त्या सर्वांवर नियंत्रण ठेवण्याचे महत्त्वाचे काम मुख्याध्यापक करीत असतात. आश्रमशाळेचे वर्षभराचे नियोजन करण्याचे काम मुख्याध्यापकांकडे असते. शिक्षक, ते शिकवित असलेल्या विषयांचे नियोजन व मूल्यमापन, प्रत्येक विद्यार्थ्यांची व्यवस्था व त्यांची वर्षभरातील प्रगती, इयत्ता १० वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक कामगिरी सुधारणे, शिक्षक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यात शिस्त बाणवणे, विद्यार्थ्यांच्या आरोग्याची काळजी घेणे, त्यांना मिळणारा नाश्ता, जेवण यांची गुणवत्ता रोजच्या रोज तपासणे, शाळेत कोणताही अनुचित प्रकार घडणार नाही याची काळजी घेणे, विद्यार्थ्यांना स्वच्छतेची सवय लावणे, आपल्या सहाय्यकाकडून किंवा इतर कर्मचाऱ्यांकडून व विद्यार्थ्यांकडून गैरवर्तवणूक किंवा शिस्तीचा भंग होणार नाही याची काळजी घेणे अशा महत्त्वाच्या जबाबदाऱ्या मुख्याध्यापकांवर असतात. मात्र असे असतानाही मुख्याध्यापकाच्या ६५ मंजूर पदांपैकी तब्बल १९ पदे रिक्त आहेत. यावरून शासन दरबारी आश्रमशाळांचे स्थान किती दुर्लक्षित आहे हे समजते. आश्रमशाळा आणि त्यात शिकणारा आदिवासी विद्यार्थी हा शासनाच्या कोणत्याच प्राधान्यक्रमावर नाही, हे दुर्दैवी वास्तव आश्रमशाळांच्या सर्वेक्षणावेळी सातत्याने अधोरेखित होत होते.

तक्ता क्र.५

| मुख्याध्यापक | पालघर | वाडा | वसई | विक्रमगड | तलासरी | जव्हार | डहाणू | मोखाडा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मंजूर पदे | ७ | १३ | २ | ८ | ८ | ९ | १० | ८ | ६५ |
| भरलेली पदे | ३ | १३ | १ | ७ | ५ | ८ | ३ | ६ | ४६ |
| रिक्त पदे | ४ | - | १ | १ | ३ | १ | ७ | २ | १९ |

## आश्रमशाळेतील मुलींची सुरक्षितता कंत्राटावर!

ज्या आश्रमशाळांमध्ये मुली शिक्षण घेत आहेत त्या प्रत्येक आश्रमशाळेत स्त्री अधिक्षिका असणे अनिवार्य आहे. मान. उच्च न्यायालयात दाखल केलेल्या सुमोटो (Suo-motto) याचिकेनुसार प्रत्येक आश्रमशाळेत स्त्री अधिक्षिका नेमणे गरजेचे आहे. मात्र पालघर जिल्ह्यातील पाहणी केलेल्या ६० आश्रमशाळांपैकी २६ आश्रमशाळांमध्ये महिला अधिक्षिकेचे पद भरलेले आहे. २५ आश्रमशाळांमध्ये स्त्री अधिक्षिकेचे पद आजही भरले गेलेले नाही. तर ९ आश्रमशाळेत इतके जबाबदारीचे पद कंत्राटी तत्त्वावर भरलेले आहे. त्यांना दरमहा केवळ रु. २२००/- इतके नाममात्र मानधन दिले जाते.

शासकीय आश्रमशाळेच्या वा वसतिगृहाच्या इयत्ता १ ली ते १२ वी पर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या देखरेखीसाठी आणि विशेषत : आरोग्याचा दर्जा सुव्यवस्थित ठेवण्यासाठी 'महिला अधिक्षिका' विशेष जबाबदार असते तसेच या मुलींच्या वैयक्तिक स्वच्छतेची जबाबदारी देखील स्त्री-अधिक्षिकेवर टाकण्यात आलेली आहे. वयात येणाऱ्या मुलींना लैंगिक शिक्षण देणे, त्यांच्यात होणारे शारीरिक-भावनिक बदलांविषयी मोकळेपणाने बोलणे हे आवश्यक असते आणि ते स्त्री अधिक्षिकाच उत्तमरित्या करू शकते. निवासी विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्वाचा विकास होण्याच्या दृष्टीने कार्यक्रम आखणे, निवासी विद्यार्थिनींचा सकाळचा नाश्ता व दुपार-रात्रीचे जेवण, या सर्व गोष्टी जातीने पाहणे तसेच विद्यार्थिनींशी कोणताही अनुचित प्रसंग घडणार नाही याची काळजी घेणे या सर्व जबाबदाऱ्या स्त्री-अधिक्षिकेवर असताना आज पालघर तालुक्यात ३४ आश्रमशाळांमध्ये स्त्री - अधिक्षकेची पदे अद्यापही रिक्त आहेत.

तक्ता क्र.६

| स्त्री-अधिक्षक | पालघर | वाडा | वसई | विक्रमगड | तलासरी | जव्हार | डहाणू | मोखाडा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मंजूर पदे | ७ | ९ | ३ | ७ | ८ | ९ | १० | ७ | ६० |
| भरलेली पदे | ५ | ५ | १ | ५ | २ | ३ | ३ | २ | २६ |
| रिक्त पदे | २ | ३ | - | १ | ६ | २ | ७ | ४ | २५ |
| कंत्राटी पदे | - | १ | २ | १ | ० | ४ | - | १ | ९ |

## पुरुष अधिक्षकाविना आश्रमशाळा बेवारस!

आश्रमशाळेतील स्त्री अधिक्षिका प्रमाणेच पुरुष अधिक्षकाचे महत्त्व देखील तितकेच आहे. शाळांमध्ये १ली पासून १२वी पर्यंत विद्यार्थी शिकत असतात. प्रत्येक विद्यार्थ्याच्या अडचणी वेगवेगळ्या असतात. सर्व विद्यार्थ्यांमध्ये संघ भावना निर्माण करणे. एकमेकांविषयी आदर भाव वाढविणे. सर्व विद्यार्थ्यांचा आरोग्याचा दर्जा उत्तम ठेवणे. प्रत्येक विद्यार्थ्याचा व्यक्तिमत्व विकास कसा होईल यासाठी सतत प्रयत्न करणे. त्यांना जेवण, नाश्ता योग्यरितीने मिळतो किंवा नाही याची काळजी घेणे, आजारी विद्यार्थ्यांची काळजी घेणे, त्यांना तात्काळ उपचार प्राप्त करून देणे इत्यादी अनेक जबाबदाऱ्या अधिक्षकावर आहेत. परंतु ३५ आश्रमशाळा वगळता २५ आश्रमशाळांमध्ये पुरुष अधिक्षकांचे पद अद्यापही रिक्त आहे.

तक्ता क्र.७

| अधिक्षक | पालघर | वाडा | वसई | विक्रमगड | तलासरी | जव्हार | डहाणू | मोखाडा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मंजूर पदे | ७ | ९ | ३ | ७ | ८ | ९ | १० | ७ | ६० |
| भरलेली पदे | ३ | ७ | ३ | ५ | ५ | ५ | २ | ५ | ३५ |
| रिक्त पदे | २ | २ | - | १ | ३ | ३ | ८ | २ | २१ |
| कंत्राटी पदे | २ | - | - | १ | - | १ | - | - | ४ |

आश्रमशाळेतील आर्थिक बाबी सांभाळण्याचे, त्यांचा लेखा-जोखा ठेवणे, विकास निधींचे हिशोब ठेवणे, अर्थसंकल्प तयार करणे व तो अंमलात आणणे. वेतन, बिले, आवक-जावक पत्रव्यवहार, पैशांचा व्यवहार, बँकेची कामे अशी निरनिराळी महत्त्वाची कामे लिपिक करत असतो. तो जर नसेल तर आश्रमशाळेची आर्थिक घडीच विस्कळीत होईल व सर्व व्यवहार कोलमडून पडू शकतात. असे असताना आज पालघर जिल्ह्यातील १४ आश्रमशाळा वगळता ४६ इतक्या आश्रमशाळांमध्ये लिपिक हे पद रिक्तच आहे.

## संगणक शिक्षकाविना बंद संगणक: प्रयोगशाळा शिक्षकांविना ओसाड प्रयोगशाळा :

सध्या डिजिटलायजेशनचा जमाना आहे. जग इंटरनेटद्वारे एकमेकांशी जोडले जात आहे. माहितीचे आदान प्रदान होत आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी संगणक साक्षर होणे गरजेचे होऊन बसले आहे. जगात कोणत्या घटना घडत आहेत, कोणते शोध लागत आहेत यांची माहिती इंटरनेटद्वारे मिळत असते. त्यामुळे संगणकाचे आजच्या युगातील महत्त्व ओळखता आश्रमशाळांमध्ये देखील संगणकाचे वर्ग सुरू केले गेले. परंतु पालघर मधील सर्वच आश्रमशाळांमध्ये संगणक शिक्षक पदे रिक्त आहेत. शिक्षकाविना बंद संगणकांकडे पाहत ‘डिजिटल महाराष्ट्र’ साध्य करण्याचे स्वप्न बहुधा शासनकर्त्यांचे असावे!

पालघर जिल्ह्यातील ६० पैकी ५ आश्रमशाळांमध्ये असे आढळून आले की, संगणक आहेत परंतु त्याचे ज्ञान देण्यासाठी संगणक शिक्षकांची पदेच भरली गेली नाहीत. वर म्हटल्या प्रमाणे जर विद्यार्थ्यांना जगाशी जोडून घ्यायचे

असेल तर संगणक साक्षर करणे गरजेचे आहे. या ५ ठिकाणी संगणक आहेत, तर इंटरनेटची सोय नाही, अशा कचाट्यात आश्रमशाळेतील विद्यार्थी सापडलेला आहे. एम. ए. शिकलेला शिक्षक विज्ञान शिकवतो, इतकी दैना आश्रमशाळांतील शिक्षणाची आहे.

काही आश्रमशाळांमध्ये इयत्ता ११ वी १२ वी विज्ञान शाखेचे वर्ग सुरू करण्यात आले आहेत, परंतु त्यासाठी प्रयोगशाळाच उपलब्ध नाही. ज्या ठिकाणी प्रयोगशाळा आहेत तेथे प्रयोगशाळा शिक्षक नाहीत. प्रयोग करण्यासाठी दर्जेदार साहित्य नाही. अशा स्थितीत हे विद्यार्थी वैज्ञानिकतेशी कसे जोडले जाणार? आणि मग पुन्हा हेच शासन बालमृत्यू-मातामृत्यूंसाठी आदिवासींमधील अंधश्रद्धा - रुढींचे कारण देऊन स्वत:ची जबाबदारी झटकायला मोकळे!

ज्या आश्रमशाळांमध्ये इयत्ता ११ वी १२वी चे वर्ग भरविले जातात अशासाठी तसेच विज्ञान शाखेसाठी प्रयोगशाळा व शिक्षक आवश्यक असतात. जेणे करून या वर्गात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमाचा एक भाग म्हणून निरनिराळे वैज्ञानिक प्रयोग करावे लागतात. त्यासाठी सुसज्ज अशी प्रयोगशाळा व त्याबद्दल माहिती असणारे प्रशिक्षित असे शिक्षक आवश्यक असतात. मात्र पालघर मधील इयत्ता ११ वी १२वी सायन्स असलेल्या आश्रमशाळांमधील एकाही आश्रमशाळांमध्ये प्रयोग शाळा शिक्षक नाहीत.

## आश्रमशाळांची सुरक्षितता पहारेकऱ्यांविना टांगणीवर!

पहारेकरी हा आश्रमशाळेचा रक्षणकर्ता असतो. आश्रमशाळेच्या इमारतीपासून, आवार, कंपाऊंड तसेच शाळेतील सर्व प्रकारचे साहित्य, शालेय दप्तर, रजिस्टर व कागदपत्रे, लेखा विभागाचे सर्व लेखा व कागदपत्रे यांचे संरक्षण करण्याची जबाबदारी सुरक्षा रक्षकांवर असते. तसेच शाळेतील विद्यार्थी -विद्यार्थिनीच्या संरक्षणाची जबाबदारी पहारेकऱ्याची असते. तसेच आश्रमशाळेत येणाऱ्यांची व आश्रमशाळेतून बाहेर जाणाऱ्यांची नोंद ठेवण्याचे काम देखील पहारेकऱ्यांचे असते. असे असताना २९ आश्रमशाळा वगळून ३१ इतक्या आश्रमशाळांमध्ये पहारेकरी (सुरक्षा रक्षक) हे पद रिक्त आहे. खामगाव, बुलडाणा आश्रमशाळेतील विद्यार्थिनीवरील लैंगिक अत्याचाराच्या घटनेच्या पार्श्वभूमीवर पहारेकऱ्यांच्या रिक्त पदांचे वास्तव गंभीर आहे.

## स्वयंपाकी, कामाठी, शिपाई, सफाई कामगारांची बहुतांश पदे रिक्तच!

स्वयंपाक घर, झाडून सारवून घेणे, स्वच्छता राखणे, स्वयंपाक बनविणे, आजारी मुलांसाठी डॉक्टरांच्या सल्ल्याने विशेष पुरेसा आहार शिजविणे, स्वच्छ व वेळच्या वेळी आहार तयार करण्याची जबाबदारी स्वयंपाकीवर असते. आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांचा जेवणाचा मुख्य प्रश्न असतो. **'बहुदा रिकाम्या पोटी दर्जाहीन शिक्षण घेऊन आयुष्यभर अकुशल राहा'** असा सल्ला आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शासनकर्त्यांचा असावा.

आश्रमशाळेतील आवार, खोल्या झाडून स्वच्छ करणे, आश्रमशाळेतील मुलांसाठी पिण्यायोग्य स्वच्छ पाणी भरणे, मुलांचे जेवण वाढण्यासाठी स्वयंपाक्यांना मदत करण्याचे तसेच रात्रीच्या वेळी लागणाऱ्या दिवाबत्तीची सोय करण्याचे काम कामाठी करीत असतात. आश्रमशाळेतील कार्यालयीन कामकाज करणे, आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यासाठी मदत करणे, विद्यार्थ्यासाठी मुख्याध्यापकांनी काढलेली सूचना शिक्षक, विद्यार्थ्यांना अवगत करणे, आश्रमशाळेचे टपाल पोहचविणे तसेच आश्रमशाळेत कोणताही अनुचित प्रकार होणार नाही. यासाठी सतर्क राहणे अशी विविध कामे शिपायांना करावी लागतात. सफाई कामगारांवर आश्रमशाळेच्या वर्गखोल्या, भोजनगृह, शाळेचे कार्यालय, वसतिगृह खोल्या व आवार स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी देण्यात आली आहे. त्याच प्रमाणे मुला-मुलींचे स्वच्छतागृहे, स्नानगृहे दररोज कमीत कमी दोन वेळा स्वच्छ करण्याची जबाबदारी देण्यात आलेली आहे. आश्रमशाळेत स्वच्छतेची स्थिती चिंताजनक आहे. हे शासन करोडो रुपये 'स्वच्छ भारत अभियाना'वर खर्च करते बहुदा हेच शासनाचे 'स्वच्छ भारत मिशन' असावे!

# आश्रमशाळेतील सेवा-सुविधांची वानवा

## 'हागिनदारी मुक्त' महाराष्ट्रात आमची मुलं-मुली मात्र शौचास उघड्यावर जातात हे लांच्छनास्पद!

'स्वच्छ भारत'चा उदोउदो करीत जाहिरातींसाठी करोडोंचा खर्च करणारे आपले घोषणाबाज शासन आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांबाबत मात्र उदासीन आहे. उत्तम आरोग्यासाठी दर्जेदार व आवश्यक उष्मांक मिळणारे जेवण जेवढे महत्त्वाचे आहे, तितकीच आरोग्यासाठी स्वच्छता ही महत्त्वाची आहे. पालघर जिल्ह्यातील आश्रमशाळांमध्ये स्वच्छतेच्या नावाने आनंदी आनंदच आहे. मोडकळीस आलेल्या आश्रमशाळा, नादुरुस्त व तडा गेलेल्या भिंती, आफ्रिकेतील गरीब देशांनाही लाजवतील अशी मोडून पडलेली व घाणीने तुंबलेली शौचालये, पाण्याची सोय नसलेली आणि खिडक्या-दरवाजे नसलेली न्हाणीघरे व शौचालये बहुतांश आश्रमशाळांमध्ये आढळून आली. माणसास वापरण्यास अयोग्य व किळस आणणारी शौचालय असल्याचे पाहणीत दिसून आले आणि यामुळे आश्रमशाळेत आरोग्याचा प्रश्न निर्माण झालेला आहे. सरासरी २० मुलांमागे एक शौचालय हवे असताना आश्रमशाळेत ८०-९० मुलांमागे एक शौचालय असल्याचे दिसून आलेले आहे. धड शौचालय नाहीत व जी आहेत ती वापरण्याजोगी नाहीत. या बिकट परिस्थितीत आश्रमशाळेतील मुलांना दिवस कंठावे लागत आहेत.

शौचालयाबाबत अशी शोकांतिका असल्याने जवळजवळ सर्व मुलांना उघड्यावर शौचास जावे लागते. मुलींनाही आडोसा गाठून उघड्यावर शौचास जावे लागते. वयात आलेल्या मुलींसाठी शौचालय नसणे व उघड्यावर शौचास जाणे अतिशय लाजिरवाणे आहे. **शासकीय आश्रमशाळा ऐना, जव्हार येथे मुलां-मुलींसाठी एकही शौचालय नाही. त्यामुळे या शाळेतील सर्व मुलांना उन-वारा-पावसात उघड्यावरच शौचास जावे लागते.** इथे संविधानाने प्रदान केलेल्या सन्मानाने जगण्याचा हक्क शासनाने पायदळी तुडवला आहे.

खामगांव, बुलढाणा येथील आश्रमशाळेतील मुलींच्या लैंगिक शोषणाची दुर्दैवी घटना ताजी असताना आश्रमशाळांचे आमच्या पाहणीतले हे वास्तव खामगाव, बुलढाणा सारख्या घटना राज्यातील इतर अनेक आश्रमशाळांमध्ये होण्याविषयीची संभाव्यता नाकारता येणार नाही.

### मुलींसाठी शौचालयांची उपलब्धता

तक्ता क्र. ८

| | पालघर | वाडा | वसई | विक्रमगड | जव्हार | तलासरी | डहाणू | मोखाडा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थिनी | १२४६ | २१५६ | ५७६ | २३२२ | ३०३३ | १९३९ | २०२३ | १६१० | **१४९०५** |
| प्रत्यक्ष शौचालय | ४८ | ६३ | १९ | ६४ | ७६ | ६५ | ३५ | २९ | **३९९** |
| आश्यकतेपेक्षा कमी शौचालय | १५ | ४५ | १० | ५२ | ७६ | ३२ | ६६ | ५१ | **३४७** |

### मुलांसाठी शौचालयांची उपलब्धता

तक्ता क्र. ९

| | पालघर | वाडा | वसई | विक्रमगड | जव्हार | तलासरी | डहाणू | मोखाडा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी | १३३६ | २८२२ | ७४९ | २६७८ | २५९२ | २९४५ | ३०९६ | २०५३ | **१८२७१** |
| प्रत्यक्ष शौचालय | २६ | ६५ | १४ | ६१ | ३८ | ७३ | ७७ | ३३ | **३८७** |
| आवश्यकतेपेक्षा कमी शौचालय | ४१ | ७६ | २३ | ७३ | ९२ | ७४ | ७८ | ७० | **५२७** |

## स्नानगृहांविना मुलींची सुरक्षितता चव्हाट्यावर!

आश्रमशाळेतील मुला-मुलींच्या आरोग्यांच्या दृष्टीने त्यांना दिल्या जाणाऱ्या सुविधांचे विशेष महत्त्व आहे. मुलांना आंघोळीसाठी अतिशय निकृष्ट दर्जाचे साबण देऊन हे शासन मुलांच्या आरोग्याशी खेळत आहे. टुथपेस्ट, तेल, साबण व इतर साहित्यात वारेमाप खर्च शासन करीत आहेत. मात्र दर्जा अत्यंत निकृष्ट! गांभीर्याचा मुद्दा म्हणजे स्नानगृह बराचशा आश्रमशाळांमध्ये अस्तित्वातच नाहीत. उपलब्ध स्नानगृह ही मोडकळीस आलेली व घाणीचे साम्राज्य असलेली आहेत. आंघोळीसाठी मुलां-मुलींना विहीर, ओहोळ गाठावे लागते. कडाक्याच्या थंडीतही उघड्यावर आंघोळ करून गारठावे लागते. **शासकीय आश्रमशाळा ऐना, जव्हार येथे मुलां-मुलींसाठी एकही स्नानगृह नाही. त्यामुळे या शाळेतील सर्व मुलांना पावसात-थंडीत थंड पाण्याने आंघोळ करून गारठावे लागते.** बराचशा आश्रमशाळेत मुलींनांही तात्पुरता आडोसा करून आंघोळ करावी लागते. बहुतेक आश्रमशाळेतील पाण्याची व्यवस्था नसल्याने मुलींना १-२ किलोमीटर दूर वरून पाणी आणावे लागते. फेब्रुवारीनंतर पाण्याअभावी विद्यार्थ्यांचे प्रचंड हाल होतात. विद्यार्थ्यांना पाण्यासाठी व आंघोळीसाठी बाहेर जावे लागते अशावेळी नदीत किंवा तलाव-विहिरीत बुडून मृत्यूच्या घटनाही अनेक घडतात. तसेच साप-विंचू चावून झालेल्या विषबाधेमुळे अनेकदा विद्यार्थी विद्यार्थ्यांच्या जीवावर बेतते. सुविधांअभावी प्रत्येक विद्यार्थ्यांला दिवसातील २-३ तास केवळ पाणी, आंघोळ, शौचालय यामध्येच जातो. या प्रगत महाराष्ट्रात मुलांनी ज्ञानार्जन करायचे तरी कधी?

आश्रमशाळेतील विद्यार्थी व अस्तित्वात असलेले स्नानगृह यांची सरासरी पाहिल्यास विद्यार्थी व आश्रमशाळेची दुरवस्था निदर्शनास येईल. आंघोळीसाठी गरम पाणी नाही आणि बादल्या व इतर साहित्याची उपलब्धता या बाबी तर विद्यार्थ्यांच्या गावीही नाहीत.

### मुलींसाठी स्नानगृहांची उपलब्धता

तक्ता क्र. १०

| | पालघर | वाडा | वसई | विक्रमगड | जव्हार | तलासरी | डहाणू | मोखाडा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थिनी | १२४६ | २१५६ | ५७६ | २३२२ | ३०३३ | १९३९ | २०२३ | १६१० | **१४९०५** |
| प्रत्यक्ष स्नानगृह | ३९ | ५४ | २५ | ५६ | ८५ | ३७ | २८ | ३३ | **३५७** |
| आवश्यकते पेक्षा कमी स्नानगृह | २३ | ५४ | ४ | ६० | ६७ | ६० | ७३ | ४७ | **३८८** |

### मुलांसाठी स्नानगृहांची उपलब्धता

तक्ता क्र. ११

| | पालघर | वाडा | वसई | विक्रमगड | जव्हार | तलासरी | डहाणू | मोखाडा | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| विद्यार्थी | १३३६ | २८२२ | ७४९ | २६७८ | २५९२ | २९४५ | ३०९६ | २०५३ | **१८२७१** |
| प्रत्यक्ष स्नानगृह | २२ | ५६ | १० | ५४ | ३६ | ५४ | ५१ | ३२ | **३१५** |
| आवश्यकते पेक्षा कमी स्नानगृह | ४५ | ८५ | २७ | ८० | ९४ | ९३ | १०४ | ७१ | **५९९** |

## विद्यार्थी निवासस्थान की कोंडवाडे ?

आश्रमशाळा संहितेनुसार विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र निवासस्थान असणे आवश्यक आहे. त्यानुसार प्रत्येक विद्यार्थ्यांसाठी निवासाकरीता किमान २४ चौ. फूट व कमाल ४० चौ. फूट खोली असणे बंधनकारक आहे. पालघर जिल्ह्यातील सर्वे केलेल्या ६० आश्रमशाळांपैकी ४ आश्रमशाळेत विद्यार्थ्यासाठी स्वतंत्र निवासाची व्यवस्था आहे. उर्वरित सर्व आश्रमशाळेत वर्गखोलीतच निवासाची व्यवस्था केलेली आहे. विद्यार्थी संख्या जास्त, मात्र त्या तुलनेत वर्गखोल्या कमी असल्याने अतिशय दाटीवाटीने विद्यार्थ्यांना झोपावे लागते. काही विद्यार्थ्यांना जागेअभावी व्हरांड्यात झोपावे लागते. पावसाळ्यात गळणाऱ्या छतामुळे व तुटलेल्या खिडक्या-दरवाजांमुळे पावसात-थंडीत विद्यार्थ्यांना प्रचंड हाल-अपेष्टांना सामोरे जावे लागते. आश्रमशाळेत पलंग-गाद्या ही सुविधा तर दुरापास्तच आहे. साधी चटई व एक जुने झालेले पांघरुण अशा तुटपुंज्या साहित्यात विद्यार्थी कसे-बसे झोपतात. काही आश्रमशाळेत तर मुले फरशीवरच झोपतात. आश्रमशाळेत एकाच वर्गखोलीत ९० इतकी निवास व्यवस्था आणि त्यातच स्नानगृह- शौचालय अशीही स्थिती आहे. त्यामुळे सकाळच्या सत्रात शाळा सुरू होण्याच्या आधी विद्यार्थ्यांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागतो आणि त्या साऱ्यांचा विपरित परिणाम अंतिमत: विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होतो.

## निकृष्ट, अपुऱ्या भोजनापायी मुलांचे कुपोषण !

आश्रमशाळेत भोजनाचा दर्जा राखला जात नाही. बहुतेक आश्रमशाळेत निकृष्ट धान्य वापरले जाते. पालघर-डहाणू मधील काही आश्रमशाळेत मध्यवर्ती स्वयंपाकगृह योजना राबविली जात आहे. आश्रमशाळेत दिली जाणारी फळांची गुणवत्ता अतिशय निकृष्ट आहे. आश्रमशाळेतील दोन भोजनामधील अंतरही विद्यार्थ्यांच्या आरोग्यास अपायकारक ठरते. सकाळी नाश्ता झाला की १२ वा. दुपारचे जेवण मिळते त्यानंतर संध्याकाळी ७ वा. थेट रात्रीचे जेवण मिळते. याचाच अर्थ दुपारचे जेवण व रात्रीचे जेवण यात तब्बल ७ तासांचे अंतर असते आणि रात्रीचे जेवण ७ वा. झाल्यानंतर सकाळी ८ वा. नाश्ता दिला जातो. सकाळची आंघोळ-शौचालय या घाई-गडबडीत सकाळचा नाश्ता चुकल्यास दोन जेवणातील अंतर जवळ जवळ १८ तास भरते. आश्रमशाळेतील भोजनाचा दर्जा सुधारताना दोन जेवणामधील अंतर कमी करून विद्यार्थ्यांना योग्य, पुरेसा व किमान दर ३ तासांनी दर्जेदार भोजन असणे गरजेचे आहे.

## आहाराची वेळ व पदार्थ :

तक्ता क्र. १२

| अक्र. | वेळ | पदार्थ |
|---|---|---|
| १. | सकाळची न्याहरी (०८ ते ०९) | पाव/पोहे/उपमा, दूध व साखर |
| २. | दुपारचे जेवण (१२ ते १ वाजता) | पोळी/ भाकरी, भात, डाळ, भाजी |
| ३. | अल्पोहार दुपारी (२.४५ वाजता.) | उसळ शेंगदाणे |
| ४. | सायंकाळचे जेवण (०६.३० वाजता) | पोळी/भाकरी, भात, डाळ व भाजी |

### आश्रमशाळेच्या सध्याच्या भोजन-नाश्त्याच्या वेळापत्रकामुळे विद्यार्थ्यांचे होतेय कुपोषण

**विद्यार्थ्यांचे वाढते वय; रोजची दिनचर्या व दिला जाणाऱ्या आहारातील पोषणतत्त्वे लक्षात घेता दोन जेवणातील अंतर ४ तासापेक्षा जास्त नसावे. तसेच रात्रीचे जेवण ८ ते ८.३० वाजता देताना सकाळचा नाश्ता ७ ते ७.३० दरम्यान असल्यास विद्यार्थ्यांना सोयीचे ठरेल. किमान दर ४ तासांनी त्यांना काही ना काहीतरी पोषक पूरक आहार दिला जावा.**

## आश्रमशाळेतील दिनचर्या

तक्ता क्र. १३

| अक्र. | कार्यक्रम | गट वेळ इयत्ता १ ली ते १२ वी | |
|---|---|---|---|
| | | पासून | पर्यंत |
| १ | सकाळी उठणे/ प्रार्थना | ०५.४५ | ०६.०० |
| २ | प्रातर्विधी | ०६.०० | ०७.०० |
| ३ | वैयक्तिक स्वच्छता, आंघोळ, कपडे , धुणे, व्यायाम इ. | ०७.०० | ०८.०० |
| ४ | सकाळचा नाश्ता | ०८.०० | ९.०० |
| ५ | शालेय कामकाज (सकाळचे सत्र) | ०९.०० | १२.०० |
| ६ | जेवण-दुपार | १२.०० | ०१.०० |
| ७ | विश्रांती-दुपार | ०१.०० | ०१.३० |
| ८ | शालेय कामकाज (दुपारचे सत्र) | ०१.३० | ०४.३० |
| ९ | खेळ | ०४.३० | ०६.०० |
| १० | वैयक्तिक स्वच्छता | ०६.०० | ०६.३० |
| ११ | सायंकाळचे जेवण | ०६.३० | ०७.३० |
| १२ | अभ्यास(रात्री) | ०७.३० | १०.०० |
| १३ | झोपणे (रात्री) | १०.०० | ०५.४५ |

### आश्रमशाळा हे निवासस्थान विद्यार्थ्यांचे की श्वापदांचे?
### मोडकळीस आलेल्या इमारती अन् गळकी छप्परे!

आज शासन कौशल्य शिक्षण, विद्यार्थ्यांचा कल लक्षात घेऊन शिक्षण देणे तसेच शैक्षणिक संस्कृतीच्या वल्गना करते. मात्र भूकंपाने उद्ध्वस्त झालेल्या एखाद्या भग्न वास्तूसारख्या आश्रमशाळांच्या इमारती पाहता वाटते की, इथले विद्यार्थी किमान मूलभूत सोयी-सुविधांपासूनही वंचित आहेत. त्यामुळे शैक्षणिक संस्कृतीचा तर या आश्रमशाळांना वाराही नाही. मोडकळीस आलेल्या या आश्रमशाळांमध्ये जीव मुठीत घेऊन विद्यार्थी राहतात. कधी एखादी भिंत कोसळेल तर कधी फुटलेल्या भिंतीतून साप निघेल, विंचू चावेल याचा भरवसा नाही. अतिशय दयनीय अवस्थेतील या आश्रमशाळांमध्ये विद्यार्थ्यांचा कोंडमारा होतो, अशा परिस्थितीत या मुलांकडून कोणता विकास अपेक्षित धरायचा? आदिवासींवर निव्वळ सूड उगविण्यासाठी शासनाने आश्रमशाळा वर्षानुवर्षे तशाच ठेवल्या आहेत की काय? असा प्रश्न पडतो.

### दुरावस्थेत राहणाऱ्या शिक्षकांकडून कोणते ज्ञानदान अपेक्षित धरायचे?

आश्रमशाळेतील कर्मचारी निवासस्थानाचीही दुरवस्था झालेली आहे. शौचालय, स्नानगृह, निवासस्थान, पाणी, वीज, अस्वच्छता आदि बाबींमुळे बहुतेक शिक्षक व कर्मचारी नजिकच्या शहरात तालुक्याच्या ठिकाणी राहतात. उदाहरण द्यायचेत झाले तर कऱ्हे येथील आश्रमशाळेत कर्मचारी निवासस्थान उपलब्ध नसल्याने बहुतेक कर्मचारी वर्गातच राहतात. काही शिक्षक स्वखर्चाने शौचालय, स्नानगृह बांधून त्याचा वापर करतात. आपल्या कुटुंबासह राहत असलेल्या कर्मचाऱ्यांनाही सेवा-सुविधांच्या अभावामुळे विद्यार्थ्यांप्रमाणेच अनेक त्रासांना सामोरे जावे लागते. आदिवासी भागात शिक्षक-कर्मचाऱ्यांच्या रिक्त पदांचे कारण हे इथे दडलेले आहे.

### संरक्षक भिंतीविना आश्रमशाळा म्हणजे शोषणाचे केंद्र:

शिक्षण हक्क कायद्यानुसार तसेच आश्रमशाळा संहितेनुसार प्रत्येक आश्रमशाळेस सुसज्ज व भक्कम संरक्षक भिंत असणे आवश्यक आहे. पालघर जिल्ह्यातील ६० आश्रमशाळापैकी ३४ आश्रमशाळांमध्ये संरक्षक भिंतच नाही. ५ आश्रमशाळेतील संरक्षक भिंत मोडकळीस आलेल्या आहेत. विद्यार्थिनींच्या शोषणाचे हेही एक कारण आहे.

## विजेविना अंधारात चाचपडताहेत आश्रमशाळा!

पालघर जिल्ह्यातील सर्वच आश्रमशाळेमध्ये वीज पुरवठा सातत्याने खंडीत होत असल्याने जनरेटर व सौरऊर्जा यंत्रावर अवलंबून राहावे लागते. सौरऊर्जा यंत्र जवळजवळ सर्व आश्रमशाळेत बंद अवस्थेत आढळून आले. सौरऊर्जा यंत्र निकृष्ट दर्जाचे तसेच दर्जा चांगला नसणे; ३-४ वर्षापासून पडून राहिल्याने गंजून बंद अवस्थेत पडून असल्याचे दिसून आले. जनरेटर सुविधा ३५ आश्रमशाळांमध्ये नाही. मोखाडा तालुक्यातील एकाही आश्रमशाळेत जनरेटरची सुविधा नाही. जनरेटर नसलेल्या आश्रमशाळेत मेणबत्तीवर वेळ निभावली जाते. जनरेटर उपलब्ध असलेल्या ठिकाणी बहुतेक वेळा डिझेल वेळेवर न मिळणे, बिघडल्यास लवकर दुरुस्त न करणे यामुळे वापरताना अडचणी येतात. अशा स्थितीत आश्रमशाळांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठीच्या शासनाच्या वल्गना सत्यात येणार तरी कशा?

## आश्रमशाळा शिक्षणाचे केंद्र की छळ-छावणी?

पालघर जिल्ह्यातील जवळजवळ सर्वच आश्रमशाळेत पाण्याची व्यवस्था नाही. शुध्द पिण्याच्या पाण्यासाठी ॲक्वागार्ड नाहीत. पिण्याच्या पाण्यासाठी बहुतेक वेळेला मुलांनाच विहीर, कुपनलिकेचा आधार घ्यावा लागतो. आंघोळ, स्वयंपाक, धुणी-भांडी, साफ-सफाई याकरीता मोजक्याच आश्रमशाळा वगळता बाकी सर्व आश्रमशाळेत नदी, तलाव, विहीर येथून पाणी आणावे लागते. विद्यार्थ्यांना नदी, तलाव, विहीर इत्यादी ठिकाणी उघड्यावरच आंघोळ उरकावी लागते. उन्हाळ्यात विद्यार्थी, कर्मचारी यांचा बराचसा वेळ पाणी नसल्यामुळे खर्च होतो. सोबत मानसिक-शारीरिक त्रास सहन करावा लागतो. त्यामुळे आश्रमशाळा हे शिक्षणाचे केंद्र की शासनाची वा शासन पुरस्कृत छळ-छावणी आहे? असा प्रश्न पडतो.

## संगणक साक्षरतेविना कसा घडवायचा डिजिटल महाराष्ट्र?

आज 'डिजिटल महाराष्ट्रा'चा नारा दिला जातो. वास्तवात मात्र शासन याबाबतीत प्रचंड उदासीन असल्याचे आश्रमशाळेत भेट दिल्यानंतर समजते. फक्त ५ आश्रमशाळेत संगणक कक्ष आहे. ५५ आश्रमशाळेत संगणक सुविधाच नाही. या ५ आश्रमशाळेत संगणक असून शिक्षक नाहीत. संगणक सुविधा निरनिराळ्या स्वयंसेवी संस्थामार्फत पुरविली जाते. लार्सन ॲण्ड टुर्बो सारख्या स्वयंसेवी संस्था आपले संगणक व सोबत त्यांचे संगणक शिक्षक पाठवितात. शैक्षणिक वर्ष संपल्यावर या संस्था संगणक परत घेऊन जातात. अनेक ठिकाणी संगणक असून शिक्षक नसल्याने विद्यार्थी त्यापासून वंचित राहतात. संगणकाची गरज असूनही आश्रमशाळेत संगणकच नाहीत. संगणक ही काळाची गरज असताना व विद्यार्थी शिकण्यास उत्सुक असतानाही शासनाच्या उदासिनतेमुळे विद्यार्थ्यांना वंचित राहावे लागते. शिक्षकांविना संगणक आणि संगणक ज्ञानाविना विद्यार्थी, हाच का आमचा 'डिजिटल महाराष्ट्र' ?

## कला शाखेचे पदवीधर विज्ञानाचे शिक्षक, आदिवासी विभागाचे अजब तर्कट!

विज्ञानात जगभरात होत असलेले संशोधन यांची आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना माहिती असणे अभिप्रेत आहे. प्रात्यक्षिकांसाहित प्रत्यक्ष अनुभवावे यासाठी प्रयोगशाळा तंत्रज्ञ व प्रयोगशाळा असणे अत्यंत गरजेचे आहे. आश्रमशाळा संहितेत प्रयोगशाळेतील साहित्यांची यादी नमूद केलेली आहे. प्रत्यक्षात प्रयोगशाळेबाबतीत वेगळीच परिस्थिती दिसते. पालघर जिल्ह्यातील पाहणी केलेल्या ६० पैकी ८ आश्रमशाळेत प्रयोगशाळा आहेत. तब्बल ५२ आश्रमशाळेत प्रयोगशाळा नाहीत. प्रयोगशाळा असलेल्या आश्रमशाळेत प्रयोगशाळा उपयोगात न आणता केवळ ते वस्तुसंग्रहालय बनून सडत पडलेले आहे. प्रयोगशाळेसाठी तंत्रज्ञ नसणे व प्रयोगासाठी योग्य साहित्य नसणे हे त्यामागचे महत्त्वाचे कारण आहे. प्रयोगशाळेत कंत्राटी तत्त्वावर एम.ए. झालेले शिक्षक आहेत. प्रयोगशाळा तंत्रज्ञ पदे अनेक ठिकाणी रिक्त आहे म्हणून कंत्राटी पध्दतीने शिक्षक भरून विद्यार्थ्यांची निव्वळ थट्टा मांडलेली आहे.

## आश्रमशाळांमध्ये ग्रंथालये केवळ कागदावरच!

आदिवासी समाजाच्या सामाजिक, आर्थिक उन्नतीसाठी शिक्षणाशिवाय पर्याय नाही. दर्जेदार शिक्षण उपलब्ध करून दिल्यास आदिवासींना विकास साधता येईल. मग हे शिक्षण शाळेतल्या पाठ्यपुस्तकातून असेल, अनुभवातून असेल, प्रत्यक्ष प्रयोग-भेटीतून असेल. शाळेत ज्ञान मिळविण्याचे माध्यम म्हणजे ग्रंथालय. एखाद्या ग्रंथालयावरून त्या शाळेचा दर्जा लक्षात येतो. पालघर जिल्ह्यातील ४ आश्रमशाळेत ग्रंथालये आहेत तर तब्बल ५६ आश्रमशाळेत ग्रंथालये नाहीत. ग्रंथालयांच्या कपाटावर साचलेली धूळ ग्रंथालयाचा वापर आणि त्याअनुषंगाने आश्रमशाळांची गुणवत्ता अधोरेखित करते. ग्रंथपाल एकाही ग्रंथालयात नाहीत. काही ग्रंथ मुख्याध्यापकाच्या खोलीत तर काही अडगळीत कचऱ्यात पडलेले आहेत.

**डहाणू तालुक्यातील शासकीय आश्रमशाळा, सायवन येथील कु. सुरेश वाघधरा या विद्यार्थ्याने आश्रमशाळेतील बिकट परिस्थितीही ९३% गुण मिळवून राज्यात आश्रमशाळेतून पहिला येण्याचा मान मिळविला. विद्यार्थ्यांनी चांगल्या दर्जेदार सेवा - सुविधा दिल्यास; ग्रंथालय सुसज्ज बनविल्यास आदिवासी विद्यार्थी व पर्यायाने आदिवासी समाज प्रगतीचे शिखर गाठू शकतो. मात्र शासन-प्रशासनाची मानसिकता व उदासिनता आदिवासी विकासाला मारक ठरत आहे.**

## विद्यार्थ्यांची आरोग्याच्या तपासणीबाबत शासन निष्काळजी; आश्रमशाळा अनारोग्याचे केंद्र!

व्यक्तीच्या शारीरिक, मानसिक, सामाजिक व बौध्दिक विकासासाठी पोषक आहार, आरोग्यविषयक भौतिक सुविधा केंद्रस्थानी आहेत. विद्यार्थ्यांना उत्तम आरोग्य असेल तर त्यांची अभ्यासात रुचि वाढते. आश्रमशाळा संहिता व शिक्षण हक्क कायद्यानुसार वर्षातून ४ वेळा विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी अनिवार्य आहे. आश्रमशाळेत हे नियम बासनात गुंडाळून ठेवलेले आहेत.

आश्रमशाळा संहितेनुसार २० प्रकारचे आजार, व्यंग व आरोग्याबाबत प्रत्येक विद्यार्थ्यांची नियमित तपासणी होणे आवश्यक आहे. ७००-८०० विद्यार्थ्यांची तीही केवळ वर्षातून फक्त एकदा व त्यातही ३-४ तासात तपासणी उरकून टाकली जाते हे वास्तव आहे. आश्रमशाळेत आरोग्य तपासणीबाबतीतील अक्षम्य दुर्लक्ष दिसून येते. आश्रमशाळेतील मुलांच्या ओढवणाऱ्या मृत्यूंना आरोग्य तपासणीमधील निष्काळजीपणाही तितकाच कारणीभूत आहे.

ग्रामीण भागात आधीच आरोग्य सेवेचा बोजवारा उडालेला आहेत. आदिवासी विभागाकडे तर सर्वांचेच दुर्लक्ष झालेले आहे. त्यामुळे आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी वर्षातून एकदा, ती ही २-३ तासात उरकली जाते. **मागील १५ वर्षात महाराष्ट्रातील आश्रमशाळेत १,०७७ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्याचे शासनानेही मान्य केलेले आहे.** आरोग्य, भोजन, स्वच्छता, शौचालय, निवासस्थान, पाणी यांची दयनीय परिस्थिती असताना आरोग्यसेवा व आरोग्य तपासणीबाबत शासनाची उदासिनता महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्याला अशोभनीय व निंदनीय आहे. अनेक आश्रमशाळांत साधी प्रथमोपचार पेटीही उपलब्ध नाही. प्रथमोपचार पेटी असल्यास त्यातील औषधे कालबाह्य झालेली आहेत. त्यामुळे आश्रमशाळा विद्यार्थ्यांच्या अनारोग्याचे केंद्र बनले आहे.

# वसतिगृह

कुपोषण, बेरोजगारी, स्थलांतर, लक्षणीय बालमृत्यू, आश्रमशाळा वसतिगृहांची दुरवस्था पाहता राज्यातील आदिवासी प्रत्येक बाबतीत दुर्लक्षित आणि बेदखल झालेला आहे हे स्पष्टपणे दिसत आहे. स्वातंत्र्याच्या सत्तरीनंतर सुद्धा हे सरकार आदिवासींचा भूकेचा प्रश्न सोडवू शकले नाही ही गोष्ट स्वातंत्र्याला कलंकित करणारी आहे हे दुर्दैवाने येथे नमूद करावे लागते.

वंचित आदिवासी घटकाला आपल्या उदरनिर्वाहासाठी स्थलांतरित व्हावे लागते आणि मग त्यांची पुढची पिढी पुन्हा एकदा शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर फेकली जाते. आदिवासींची ही पिढी शिक्षणाच्या प्रवाहात राहावी याच उदात्त हेतूने कदाचित आश्रमशाळा आणि वसतिगृहाच्या निर्मितीचा पाया रचला असावा. मात्र आज या हेतूला तर मूठमाती देण्याचे काम सुरू आहेच मात्र त्यासोबतच वंचित आदिवासींच्या शिकणाऱ्या मुलांच्या मूलभूत हक्कांचा आणि त्यांच्या सन्मानाचा उघड उघड भंग खुद्द सरकारच करताना दिसत आहे.

आदिवासी विकास विभागामार्फत राज्यातील अनुसुचित जमातीच्या मुला-मुलींना तालुका, जिल्हा व विभागीय स्तरावर माध्यमिक, उच्च माध्यमिक व महाविद्यालयीन शिक्षण घेता यावे, याकरीता ४९५ वसतिगृह मंजूर असून सध्या त्यापैकी ४९१ शासकीय वसतिगृह प्रत्यक्षात कार्यरत आहेत. आदिवासी विभागाच्या वसतिगृहात राज्यात दरवर्षी ६० हजार विद्यार्थी प्रवेश घेतात. तर २५ हजार विद्यार्थी प्रतीक्षा यादीत असतात. म्हणजेच तब्बल ४२ टक्के विद्यार्थी दरवर्षी वसतिगृहाच्या प्रवेशापासून वंचित राहतात. राहायचे कुठे हा प्रश्न समोर असणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिकायचे तरी कसे? उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढत असताना देखील सरकार नवीन वसतिगृहाची तर निर्मिती करत नाहीच, मात्र जे अस्तित्वात आहेत त्यांचेही क्षमतावर्धन करण्याचा निर्णय घेत नाही याचा अर्थ नक्की काय काढायचा? शिक्षण घेणाऱ्या आदिवासींच्या संख्येत गुणात्मक वाढ सरकारला नको आहे का? वंचित मागास घटकाच्या पुढच्या पिढीने शिकू नये हा या सरकारचा छुपा अजेंडा आहे का? असा प्रश्न पडावा अशी स्थिती आहे.

पालघर जिल्ह्यात आदिवासी विकास विभागाचे डहाणू आणि जव्हार असे दोन प्रकल्प कार्यालय आहेत. या प्रकल्पांतर्गत अनुक्रमे १७ आणि १६ असे ३३ वसतिगृह आहेत. यात १३ मुलींची वसतिगृह आहेत. या दोन्ही प्रकल्पांच्या ३३ वसतिगृहात ४ हजार ८११ विद्यार्थी राहत आहेत. श्रमजीवी संघटना आणि समर्थन संस्थेच्या पाहणी दौऱ्यात पालघर जिल्ह्यातील आदिवासी विकास विभागाचे ९ आणि समाजकल्याण विभागाचा १ अशा १० वसतिगृहाची पाहणी करण्यात आली. आदिवासींच्या शिक्षण घेऊ पाहणाऱ्या या पहिल्याच पिढीला अक्षरशः सुविधांचा मनस्ताप घेऊन शिकावं लागत आहे. **त्यात वसतिगृहांच्या दुरवस्थेचे विदारक वास्तव समोर आले.**

## वसतिगृह: सुविधांचा बोजवारा अन् आदिवासी तरुणाईचा कोंडमारा:

घरापासून दूर राहून शिक्षण घेणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या निवासाचा प्रश्न सुटावा यासाठी शासकीय वसतिगृह अस्तित्वात असलेल्या वसतिगृहांची अवस्था पाहून आदिवासींनी शिकायचे की नाही हाच प्रश्न पडतो. अपुरे मनुष्यबळ, मूलभूत सोयी-सुविधांचा अभाव, शासन निर्णयाचा भंग करून दिले जाणारे निकृष्ट भोजन, स्नानगृह-शौचालयाच्या दुरवस्थेमुळे आदिवासी विद्यार्थी विशेष म्हणजे मुलींच्या सन्मानाचा होणारा भंग वसतिगृहात रोज पाहायला मिळतोय. आता ही परिस्थिती असह्य झाली असून येथे शिकणाऱ्या

तरुणाईचा आता श्वास घुसमटत आहे. सुविधांचा बोजवारा असलेल्या वसतिगृहात आदिवासी विद्यार्थ्यांचा श्वास कोंडतो आहे.

एकीकडे आवश्यकतेपेक्षा अत्यंत कमी वसतिगृह आहेत. तर दुसरीकडे वसतिगृह आहेत मात्र त्यांची अवस्था जनावरांच्या गोठ्यांसारखी झालीय. १५ ऑक्टोबर २०१६ रोजी सरकारने शासन निर्णय जारी केला आणि २५ हजार मुलं वसतिगृह प्रवेशापासून दरवर्षी वंचित राहतात हे मान्य केले. मात्र त्यावर उपाय म्हणून जो निर्णय घेतला तोही अन्यायकारकच. या शासन निर्णयात सरकारने वसतिगृहात प्रवेश न मिळू शकलेल्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता, निवास आणि भोजन भत्ता देण्याची तरतूद केली आहे. मात्र या शासन निर्णयात फक्त विभागीय आणि जिल्हा स्तर विद्यालयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठीच ही योजना केली गेली. मग तालुका स्तरावरील महाविद्यालयांमध्ये शिकणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांनी कुठे जायचे? कसे शिकायचे? याचे उत्तर सरकार देऊ शकले काय?

**जव्हार, मोखाडा, विक्रमगड या राज्याच्या आदिवासी विकास मंत्री महोदयांच्या विधानसभा मतदार संघातील अनेक विद्यार्थ्यांनी वसतिगृहात प्रवेश न मिळाल्यामुळे शिक्षण सोडले असल्याची उदाहरण आहेत. या खच्चीकरणाला जबाबदार कोण?**

आता अस्तित्वात असलेल्या वसतिगृहांची अवस्था पाहिली तर त्यांना कोंडवाडा किंवा कारागृह म्हणावे तरी अतिशयोक्ती ठरणार नाही. ५० टक्केपेक्षा जास्त वसतिगृह ही भाड्याच्या इमारतीत आहेत, ज्यांची अवस्था ही अशी आहे की, ज्यात आदिवासी विद्यार्थ्यांची अक्षरशः घुसमट होत आहे. कोणत्याही प्रकारची डागडुजी किंवा दुरुस्ती न करता कोंडवाड्यासारख्या इमारतींमध्ये मुलांना ठेवले जात आहे. आदिवासींनी शिकायचे असेल तर जनावरांसारखे जगायची तयारी ठेवा असा अलिखित फतवाच जणू सरकारने काढला आहे असे ही परिस्थिती बघितल्यावर वाटते.

ज्या ठिकाणी स्वतंत्र इमारती आहेत त्या ठिकाणी केवळ राहण्यापुरती सोय आहे मात्र बाकी सुविधांचा सर्वत्र बोलबाला आहे. आदिवासी विकास मंत्री महोदयांच्याच गावात, वाडा येथील वसतिगृहात प्रत्यक्ष पाहणी केली तेव्हा जे वास्तव समोर आले ती परिस्थिती राज्यभरातल्या वसतिगृहांची आहे. ही सगळ्याच वसतिगृहांची वस्तुस्थिती आहे. या ठिकाणी बनवलेली इमारत १२० मुलींच्या क्षमतेची बांधली पण वसतिगृहांला असलेली ७५ मुलींची मान्यता मात्र तशीच आहे. या वसतिगृहाचे क्षमतावर्धन केले असते तर आज अधिकच्या ४५ मुलींना प्रवेश घेता आला असता. याच ठिकाणी प्रवेश न मिळाल्यामुळे विक्रमगड येथील २ आदिवासी मुलींनी प्रथम वर्ष पदवीचे शिक्षण अर्धवट सोडल्याची दुर्दैवी घटना घडली.

या ठिकाणी पाण्याची कोणतीही व्यवस्था नसून खाजगी टँकरने पाणी आणावे लागते. येथे गृहपाल हे महत्त्वाचे पद रिक्त असून कळंभे येथील अधिक्षिकांकडे प्रभारी पदभार देण्यात आला आहे. या ठिकाणी मुलींच्या संख्येचा विचार करता ९ संगणक असणे आवश्यक असताना केवळ ४ संगणक आहेत. शासन निर्णयानसार येथील भोजनाचा ठेका आदिवासी महिला बचत गट. संस्था किंवा आदिवासी व्यक्तीला प्राधान्याने देण्याबाबत सूचना असताना देखील संजय कॅटरर्स या खाजगी व्यावसायिकाला भोजनाचा ठेका दिला आहे. हा ठेकेदार येथे शासन निर्णयाचा सर्रास भंग करीत आहे. या ठिकाणी एकाही मुलीला अंडे मिळत नाही, त्याऐवजी ५० ग्रॅम बिस्कीट दिले जाते. कंदभाज्या म्हणून या ठिकाणी फक्त बटाटे दिले जातात. वर्षातून एकदाच या मुलींना पालेभाजी म्हणून मेथी दिली होती. ऋतुमानानुसार फळ द्यायच्या नियमाचा दाखला देत इथे फक्त केळी. तीही खराब होत आलेली केळी दिली जातात. लिंबाऐवजी लोणचे आणि सलाड ऐवजी

फक्त कांदा दिला जातो. शाकाहारी जेवणासोबत कोणतेही गोड पदार्थ दिले जात नसून या मुलींना जेवणात कधी दही मिळतच नाही. एकूणच आदिवासी विकास विभाग ठेकेदाराचे पोषण करून आदिवासी मुलांना कुपोषित करण्याचे काम करीत आहे. मंत्री महोदयांच्या गावातील हे वसतिगृह म्हणजे स्वतंत्र इमारती असलेल्या सगळ्या वसतिगृहांच्या दुरवस्थेचा प्रातिनिधिक नमुना आहे असे म्हणता येईल.

## १० एप्रिल आणि २९ जून २०१३ : पोषक आहार कमी करण्याचा सल्ला कुणाचा?

शासनाने ११ नोव्हेंबर २०११ला आदेश दिला आहे. त्यात वसतिगृहाच्या सुविधांबाबत सूचना आहेत. त्यात इमारत कशी असावी, स्वतंत्र ग्रंथालय, संगणक कक्ष, वीज, इ-ग्रंथालय, अभ्यास सहल, गणवेशासाठी निधी. विविध शिकवणी शुल्क. स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन. तसेच स्नेहसंमेलनासाठी प्रत्येक वसतिगृहाला २५हजार रुपये प्रतिवर्षी देण्याचे नियोजन त्यात आहे. सोबतच जेवण कसे असावे याबाबत सूचना आहेत. या आदेशात नाश्त्याला शिरा/उपमा/उसळ यासह दररोज दोन उकडलेली अंडी. सफरचंद देण्याची तरतद होती. आठवड्यातन दोन वेळा प्रत्येकी २५०-२००ग्रॅम चिकन/मटन देण्याचे तरतद होती. शाकाहारी जेवणात दोन भाज्या, सलाड, लिंबू, दही आणि गावरान तूप देणे अनिवार्य होते. चिकन-मटन, अंडी आणि सकस शाकाहारी जेवणामळे विद्यार्थ्यांना प्रथिने आणि इतर आवश्यक जीवनसत्व किमान प्रमाणात मिळण्याची तरतद या शासन निर्णयात करण्यात आली होती. दुर्दैव असे की. एक तर हा आदेश फक्त ठेकेदारी पोसण्यासाठी उपयक्त ठरला. वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी हा शासन निर्णय फक्त कागदावरच राहिला. मात्र किमान त्या निर्णयाचा आधार घेऊन विद्यार्थ्यांना आपले हक्क मागता येत होते.

मात्र त्यानंतर तर १० एप्रिल २०१३ आणि २९ जून २०१३ या दोन शासन निर्णयाप्रमाणे ११ नोव्हेंबर २०११च्या शासन निर्णयात सुधारणा करण्यात आल्या. या सुधारणा नसून आदिवासी विद्यार्थ्यांना दिलेल्या सुविधा त्यांच्याकडून हिसकावून घेतल्याचा प्रकार आहे. या सुधारणाप्रमाणे आता २ ऐवजी फक्त १ अंडे देण्याची तरतूद केली, आठवड्यातून २ वेळा ऐवजी फक्त एक वेळ २५० ग्रॅम ऐवजी फक्त २०० ग्रॅम चिकन देण्याची तरतूद केली. केळी, इतर फळं आणि सफरचंदाऐवजी फक्त १ केळे देण्याची तरतूद केली. एकीकडे सुविधा देऊन ठेकेदारी पोसली आणि पुन्हा त्या सुविधांचा घास तोंडात पोहचण्याआधीच हिसकावून घेतला गेला. अंडे आणि चिकनचे प्रमाण कमी करताना नक्की कोणते आहारशास्त्र वापरले? कोणत्या तज्ज्ञाचा सल्ला घेतला? हे प्रश्न सर्व आदिवासी विद्यार्थी विचारताहेत.

## मूलभूत हक्कांचा भंग :

अनुच्छेद २१ प्रमाणे राज्यघटनेने सन्मानाने जाण्याचा अधिकार सर्वांना प्रदान केला आहे. वसतिगृहातील आदिवासी विद्यार्थी आज अत्यंत लाजिरवाणे जीवन जगत आहेत. विशेषत: वसतिगृहांतील आदिवासी मुलींना तर क्षणोक्षणी मानहानी होत असल्याचे जाणवत असेल. **उघड्यावर शौचास जावे लागणे, कुठे उघड्यावर, तर कुठे दरवाजे नसलेल्या आणि गोणपाटचा पडदा असलेल्या मोडक्या स्नानगृहात आंघोळ करावी लागणे, सफाई कामगार नसलेल्या वसतिगृहात येथील विद्यार्थ्यांनाच शौचालय स्वच्छ करावे लागणे हे या मुलांच्या सन्मानाने जगण्याच्या मूलभूत अधिकारांचा विशेषत: येथील वयात आलेल्या मुलींच्या मूलभूत अधिकारांचा उघड उघड भंग आहे** आणि हा भंग दुसरा तिसरा कुणी करत नसून खुद्द शासनच करीत आहे.

**उदाहरणच द्यायचे तर राज्याचे आदिवासी विकास मंत्री महोदय विष्णू सवरा हे ज्या विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताहेत त्याच विक्रमगड मतदारसंघातील आदिवासी मुलींचे शासकीय वसतिगृह, विक्रमगड हे चक्क एका पोल्ट्री फार्मच्या शेड मध्ये सुरू आहे. ही शेड अत्यंत असुविधाजनक नादुरुस्त आहे. या ठिकाणी ७० मुलींसाठी ५ शौचालये असून त्यातील फक्त २ शौचालये वापरात आहेत. या ठिकाणी पत्र्याच्या पार्टिशनचे ५ तकलादू स्नानगृह असून त्यातच मुलीना आंघोळ करावी लागते. छप्पर गळके असून निवासाची सोय देखील अपूर्ण आहे. कर्मचाऱ्यांना निवासस्थान नाही, ना पिण्याचे स्वच्छ पाणी, ना आंघोळीला गरम पाणी, झोपायला अत्यंत जीर्ण झालेल्या फाटक्या गाद्या, तर कसेबसे अंग झाकेल असे पांघरूण अशी अवस्था या वसतिगृहाची आहे. जर या ठिकाणी खुद्द मंत्री महोदयांच्या गावातच आदिवासींच्या मुली अशा खुराड्यात राहून शिक्षण घेत असतील तर राज्याच्या इतर वसतिगृहांबद्दल स्वतंत्र तपशील मांडण्याची इथे आवश्यकता वाटत नाही.**

शिक्षण क्षेत्रात आज प्रचंड स्पर्धा आहे, एकीकडे अवास्तव शुल्क आकारणाऱ्या शैक्षणिक संस्था, लाख-दोन लाख रुपये भरून खाजगी शिकवणी घेणारी, अत्यंत ऐशारामाचे जीवन जगणारी मुलं ज्या स्पर्धेत आहेत, त्यांच्याशी शिक्षणासाठी परवड होत असलेल्या आणि गुणात्मक दर्जा नसलेले शिक्षण मिळणाऱ्या आदिवासी मुलांनी कशी स्पर्धा करायची? सत्तर वर्षानंतरही ज्या आदिवासींच्या झोपडीत स्वातंत्र्याचा प्रकाश पोहोचू शकलेला नाही त्या वंचित आदिवासींच्या मोठ्या उमेदीने शिक्षण घेऊ पाहणाऱ्या, ज्ञानाच्या अवकाशात झेप घेऊ पाहणाऱ्या या पाखरांचे पंख छाटून त्यांना नाउमेद खुद्द सरकारच करीत आहे हेच खरे आहे.

## विद्यार्थी वाढले मात्र वसतिगृहांची क्षमता 'जैसे थे' :

पालघर जिल्ह्यातील आदिवासी बांधवाना पुरेसा रोजगार उपलब्ध नाही. परिणामी दोन वेळच्या पोटभर अन्नासाठी हजारो आदिवासी गेली अनेक वर्षे ठाणे, रायगड इत्यादी ठिकाणी रोजगाराच्या शोधात जाताहेत. या स्थलांतरामुळे मोठ्या प्रमाणात आदिवासी बालके शिक्षणाच्या प्रवाहातून बाहेर फेकले जातात हे वास्तव आहे. ही विद्यार्थी गळती रोखण्यासाठी आश्रमशाळा आणि वसतिगृह हे अत्यंत प्रभावी माध्यम ठरू शकले असते. प्राथमिक-माध्यमिक शिक्षणासाठी आश्रमशाळा आणि गावापासून दूर किंवा शहरातील शाळा/महाविद्यालयांमध्ये शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या आदिवासी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह हा एकमेव पर्याय आहे.

**स्वातंत्र्याच्या ७० वर्षानंतर सरकार आदिवासींच्या भूकेचा प्रश्न सोडवू शकले नाही. स्मार्ट आणि डिजिटल महाराष्ट्रात आदिवासींना आपल्या गावापासून १००-२००किमी दूर जाऊन उघड्यावर राहून जनावरांसारखे जगावे लागत आहे. असे असताना आदिवासींची ही पहिली पिढी शिक्षण घेण्याच्या इच्छाशक्तीने आपले घर-दार सोडून शिक्षण घेऊ पाहत आहे. मात्र हे सरकार स्थलांतरित आदिवासींच्या या हजारो मुलांना शिक्षणापासून वंचित ठेवण्याचे पातक करीत आहे.**

यावर्षी देखील डहाणू, तलासरी, पालघर, वसई, वाडा, जव्हार, मोखाडा, विक्रमगड येथे नवीन वसतिगृह किंवा अस्तित्वात असलेल्या वसतिगृहातील क्षमता वाढविली नसल्याचा फटका आदिवासी विद्यार्थ्यांना बसला आहे. दरवर्षी आदिवासी विद्यार्थ्यांच्या उत्तीर्ण होण्याचे प्रमाण एकीकडे मोठ्या प्रमाणात वाढते आहे तर वसतिगृह आणि आश्रमशाळा यांच्या क्षमतेत मात्र वाढ होत नाही. सरकारच्या उदासीन धोरणामुळे आश्रमशाळा तसेच वसतिगृहाची संख्या 'जैसे थे' असल्याने उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना तालुक्याच्या

ठिकाणी प्रवेश मिळत नाही, परिणामी या वंचित विद्यार्थ्यांना शिक्षण अर्धवट सोडून आपल्या कुटुंबियासोबत रोजगारासाठी स्थलांतर करावे लागत आहे. तर एकीकडे आदिवासी विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहित करायचे आणि त्याचवेळी त्यांना प्राथमिक व माध्यमिक शिक्षणापासून वंचितही ठेवायचे असा दांभिक कारभार सध्या आदिवासी विकास विभाग करताना दिसत आहे.

**२५ हजारापेक्षा जास्त विद्यार्थी वसतिगृह प्रवेशापासून वंचित राहत असताना देखील सरकार वसतिगृहांची संख्या आणि क्षमता वाढवत नाही, १५ ऑक्टोबर २०१६ रोजी आदिवासी विभागाने शासन निर्णय जारी करून पंडित दीनदयाळ उपाध्याय स्वयंयोजना जाहीर केली. या योजनेत सरकारने १२ हजार, १५ हजार आणि २० हजार अशा अत्यंत तुटपुंज्या वार्षिक निवासभत्त्याची तरतूद केली आहे. जिल्ह्याच्या आणि शहराच्या ठिकाणी इतक्या अत्यल्प भाड्यामध्ये कसे राहायचे हा प्रश्न आहे. दुसरे असे की, दुर्दैवाने या योजनेत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांवर पुन्हा अन्यायच करण्यात आला. या योजनेत फक्त महापालिका क्षेत्रात, शहरी भागात आणि जिल्ह्याच्या ठिकाणी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निवास, भोजन आणि शैक्षणिक साहित्य भत्ता देण्याची तरतूद केली. मग वसतिगृह प्रवेशापासून वंचित असलेल्या ग्रामीण भागात तालुक्याच्या शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी शिकायचे की नाही? असा प्रश्न सरकारनेच आदिवासी विद्यार्थ्यांसमोर उभा केलाय.**

## कंत्राटी आणि प्रभारींच्या भरवशावर वसतिगृहाचा कारभार :

एकीकडे विद्यार्थी क्षमतेप्रमाणे वसतिगृह उपलब्ध नाहीत तर दुसरीकडे जे वसतिगृह उपलब्ध आहेत त्यातही मनुष्यबळाची प्रचंड कमतरता आहे. पाहणी दौऱ्यादरम्यान आढळले की, १० वसतिगृहात तब्बल ४१ पदं ही कंत्राटी स्वरुपाने भरली गेली आहेत. वसतिगृहात सरासरी ६ पदं मंजूर आहेत. पैकी १० वसतिगृहात ४१ पदं कंत्राटी आहेत म्हणजेच ७० टक्के पदं ही कंत्राटी आहेत. तर ३० टक्के गृहपाल हे प्रभारी स्वरूपाने पाच-पाच वर्षे काम करत आहेत. अनेक ठिकाणी तर शिक्षकांकडे हा प्रभारी पदभार दिला आहे. पाहणी केलेल्या १० वसतिगृहांमध्ये ११ पदं ही पूर्णपणे रिक्त आढळली. त्या ठिकाणी कंत्राटी शिक्षक देखील भरलेले नाहीत. यात शिपाई, सफाई कामगार यांचा समावेश आहे.

सद्यस्थितीत सरकार हे कंत्राटी कारभारावर सुरू आहे. वसतिगृहात ७० टक्के पदं जर कंत्राटी भरावी लागत असतील तर आदिवासी विकास विभाग आदिवासींचे हित ही आता कंत्राटावर देते.

आदिवासीनाच ठेक्यावर कामावर ठेवून तुटपुंज्या मानधनात राबविण्याचे काम सुरू आहे. अशा कंत्राटी शिक्षकांमुळे मिळणाऱ्या सेवा देखील गुणवत्तापूर्ण नाहीत. शिक्षकांकडे गृहपालाचे पदभार असून याच गृहपालाला शिपायाचे तर विद्यार्थ्यांना सफाई कामगाराचे काम करावे लागत आहे हे अत्यंत दुर्दैवी आहे. आदिवासींच्या मुला-मुलींच्या सन्मानाचा भंग करून त्यांच्यातील शिक्षण घेण्याची उमेद संपवण्याचे काम सरकारकडूनच सुरू आहे.

## असुविधांनी भरलेल्या भाड्याच्या इमारती :

पाहणी दौऱ्यादरम्यान १० वसतिगृहांपैकी ५ ठिकाणी म्हणजेच ५०टक्के वसतिगृह भाड्याच्या इमारतीत आहेत. मोठ्या प्रमाणात भाडे खर्च होत असताना शासन स्वतंत्र इमारती होण्यासाठी पुढाकार घेत नसल्याचे दिसते. भाडेतत्त्वावरील इमारतीत दर तीन वर्षांनी डागडुजी आणि रंगरंगोटी करण्याची जबाबदारी इमारत मालकावर असताना पाच-पाच वर्षे आवश्यक दुरुस्त्याही झालेल्या नसल्याचे समोर आले आहे.

कुठे शौचालये पुरेसे नाहीत, तर कुठे शौचालये आहेत तर पाणीच नाही. मोखाड्यातील लोहार पाडा वसतिगृहात ९५ मुलांना फक्त ५ शौचालये आहेत, मात्र पाण्याची कमतरता आणि नादुरुस्तीमुळे पाच पैकी एकही शौचालय वापरात नाही. मुलं उघड्यावर शौचास जात आहेत हे वास्तव आहे. एकाही वसतिगृहात कर्मचाऱ्यांसाठी किंवा गृहपालासाठी स्वतंत्र निवासाची व्यवस्था नाही. पुरुष कर्मचाऱ्यांसाठी देखील निवासाची वेगळी व्यवस्था नाही. परिणामी, हे कर्मचारी विद्यार्थ्यांच्याच निवासात राहतात तर काही ठिकाणी अधिकारी--कर्मचारी प्रत्यक्षात मुख्यालयी राहतही नाहीत हे वास्तव आहे.

वाडा तालुक्यातील कुडूस येथील मुलींच्या वसतिगृहात अपुरे निवासस्थान असल्याचे आढळले. येथील गृहपालांनी स्वत: पुढाकार घेऊन इमारतीतील आणखी एक मजला ताब्यात घेऊन तेथे मुलींच्या निवासाची व्यवस्था केलेली आहे. आणि याबाबतचा भाडे प्रस्तावही १ जुलै २०१५ रोजी आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय जव्हार येथे दाखल केला आहे. मात्र हा प्रस्ताव गेले १६ महिने प्रलंबित असून भाडे न देताच या निवासस्थानाचा वापर सुरू असल्याचे आढळून आले. कोट्यवधी रुपयांचे रस्ते आणि इतर काम आदिवासी विभाग झपाट्याने करताना दिसत आहे. ज्या कामात ठेकेदारी पोसली जाईल अशा प्रत्येक कामाला आदिवासी विभागालेखी प्राधान्य आहे. मात्र आदिवासी मुली अपुऱ्या निवासात कोंबून-कोंबून राहतात, वसतिगृहाची अवस्था खुराड्यासारखी झालीय. अशा परिस्थितीमध्ये वसतिगृहाच्या अतिरिक्त निवासाचा भाडे प्रस्ताव १६ महिने प्रलंबित राहत असेल आणि तोही राज्याच्या आदिवासी विकास मंत्र्यांच्या तालुक्यातील वसतिगृहात ? तर याला गतिमान सरकार म्हणायचे का ? सरकारचे प्राधान्यक्रम बदलले आहेत. डिजिटल आणि स्मार्ट महाराष्ट्राच्या वल्गना करणारे हे सरकार आदिवासी विद्यार्थ्यांना पुरेशी निवास व्यवस्था करू शकत नसेल, भाड्याने घेतलेल्या निवासाचे भाडे वेळेवर देत नसेल तर हे सरकार स्मार्ट कसले ?

## मोदीजी...आम्ही अजूनही उघड्यावरच शौचाला जातो...

### स्वच्छ भारत अभियानावर करोडो रुपयांच्या जाहिराती करणाऱ्या सरकारच्याच आश्रमशाळा आणि वसतिगृहांमध्ये शौचालये

घरची परिस्थिती हलाखीची असताना घरापासून १००-१५०किलोमीटर दूर येऊन आदिवासींची ही मुलं शिक्षण घेत आहेत. मात्र सरकारने वसतिगृहांची अवस्था कारागृहांसारखी करून ठेवल्याने या मुलांचे प्रचंड मानसिक खच्चीकरण होत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी हे कोट्यवधी रुपयांच्या जाहिराती करून देशाला स्वच्छतेचा संदेश देताना दिसतात. मात्र इकडे सरकारच्याच शैक्षणिक संस्थांमध्ये आदिवासी विद्यार्थी विशेषत: वयात आलेल्या मुलींना उघड्यावर शौचास जावे लागत असेल तर सरकारला आणि पंतप्रधान मोदींना काय अधिकार आहे स्वच्छतेवर भाष्य करण्याचा ? आदिवासीच्या मुलांची ही प्रचंड मानहानी असून त्यांच्या मूलभूत अधिकारांचा भंग खुद्द त्यांचे सरकारच करीत आहे. या सरकारचे देशातील सर्वेसर्वा असलेले पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी एकदा तरी आदिवासी वसतिगृह आणि आश्रमशाळेतील शौचालयांना येऊन भेट द्यावी. जेणेकरून त्यांची जीभ देशाला स्वच्छतेचा संदेश देताना अडखळेल यात शंका नाही.

# आदिवासी विकास विभागाला आश्रमशाळांबाबत महत्त्वाच्या शिफारशी

- ज्या आश्रमशाळांमध्ये विद्यार्थिनी शिक्षण घेत आहेत त्या सर्व शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये **''स्त्री-अधिक्षक''** ही पदे भरण्यात यावीत.

- ज्या आश्रमशाळांमध्ये **''स्त्री-अधिक्षक''** हे पद उपलब्ध नाही. परिणामी आश्रमशाळांमधील विद्यार्थिनींच्या लैंगिक अत्याचाराच्या घटना अलिकडे वारंवार घडत असल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत मागील अनेक वर्षापासून विधिमंडळात अधिवेशन काळात विविध आयुधांमार्फत प्रश्‍न उपस्थित करण्यात आला असून त्याबाबत अनेक वेळा सभागृहात चर्चा घडून आल्या आहेत. संबंधित मंत्र्यांनी याबाबत सभागृहात आश्वासन देखील दिले होते. मात्र आजही आश्रमशाळांमध्ये ''स्त्री-अधिक्षक'' ची अनेक पदे आजही रिक्त आहेत. त्याची नियुक्ती करण्यात यावी तसेच यापुढे ''स्त्री-अधिक्षक'' या पदावर प्रशिक्षित नर्स मिडवाईफ यांनाच नियुक्त करण्याचेही प्रस्तावित करण्यात येत आहेत. जेणेकरून स्थानिक पातळीवरच प्राथमिक स्वरुपाची वैद्यकीय सेवा उपलब्ध होऊ शकेल.

- आश्रमशाळा व वसतिगृहातील विद्यार्थ्यांच्या आरोग्याबाबत अनेक गंभीर घटना घडत असून विद्यार्थ्यांची वेळोवेळी वैद्यकीय तपासणी करणे व योग्य औषधोपचार वेळीच उपलब्ध होणे गरजेचे आहे. सर्व आश्रमशाळांतील विद्यार्थ्यांची वर्षातून ४ वेळा आरोग्य तपासणी होणे अपेक्षित आहे.

- प्रत्येक महिन्याला प्रत्येक आश्रमशाळांना भेट देऊन आजारी विद्यार्थ्यांना औषधोपचार तसेच आवश्यकतेनुसार संदर्भ सेवा देणेसुद्धा अपेक्षित आहे. त्याचबरोबर आश्रमशाळेतील स्वयंपाकी यांची आरोग्य तपासणी, पाणी नमुन्याची तपासणी, अन्न हाताळणाऱ्या व्यक्तीची तपासणी सुद्धा झाली पाहिजे.

- आरोग्य विभागाकडून वैद्यकीय सोयी-सुविधा पुरविण्यात येत असल्यातरी अनेक वेळा योग्य व वेळेत औषधोपचार न मिळाल्यामुळे तसेच वेळोवेळी आरोग्याची तपासणी न झाल्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण होत असतो. या बाबी विचारात घेऊन सध्या कार्यरत असलेले फिरते आरोग्य पथक रद्द करून त्याऐवजी प्रत्येक २ शासकीय व अनुदानित आश्रमशाळांसाठी एक याप्रमाणे वैद्यकीय अधिकाऱ्याची व मदतनीसांची मासिक मानधनावर नेमणूक करण्यात यावी.

- आश्रमशाळेतील प्रशासन व व्यवस्थापन व शिक्षण व्यवस्थित होत नाही. आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांसाठी अन्नधान्य व इतर साहित्याचा पुरवठा वेळेवर होत नाही, दर्जेदार साहित्याचा पुरवठा बऱ्याच वेळा होत नसल्याने इमारती दुरुस्ती, नवीन बांधकामे इत्यादी सर्व बाबींवर प्रकल्प अधिकाऱ्यांना लक्ष द्यावे लागते. या प्रकल्प अधिकाऱ्यांना आदिवासी क्षेत्राबाहेरच्या सुद्धा आदिवासी विकासाच्या कामाच्या संदर्भात संबंधित प्रकल्प अधिकारी यांचीच जबाबदारी आहे. परंतु प्रकल्प अधिकारी यांचीच जबाबदारी आहे. आणि परिस्थिती अशी आहे की प्रकल्प अधिकाऱ्यांच्या अधिनस्त खूप मोठे क्षेत्र आहे.

- मागील १५ वर्षात महाराष्ट्र राज्यातील आश्रमशाळांमधून १ हजार ७७ मुलांचा मृत्यू झाल्याची कबुली केंद्रीय आदिवासी विकास खात्याचे राज्यमंत्री, श्री. मनसुख भाई वसावा यांनी मे, २०१६ रोजी लोकसभेत दिली होती. आश्रमशाळेतील विद्यार्थी विद्यार्थिथींना होत असलेल्या गैरसोयींबाबतही गंभीर मुद्दे उपस्थित झाले आहेत. काही

आश्रमशाळांमधील विद्यार्थ्यांना देण्यात येणारे निकृष्ट दर्जाचे अन्न, अपुरी तसेच नादुरुस्त शौचालये व स्नानगृहे, पिण्याचे पाणी उपलब्ध नसणे, सर्पदंश व वैद्यकीय सुविधांचा अभाव इत्यादी संदर्भातील परिस्थितीबाबत तसेच कामचुकार अधिकारी व कर्मचाऱ्यांबाबत कडक भूमिका घेण्यात यावी तसेच आश्रमशाळांमधून चांगले अन्नधान्य व वैद्यकीय सोयी-सुविधा तात्काळ उपलब्ध करून देण्यात याव्यात.

- राज्यातील आश्रमशाळेत होणारे मृत्यू याबाबत 'समर्थन'ने राज्यातील आश्रमशाळा प्रशासनातील त्रुटी शोधून त्यावर उपाययोजना केल्या जाणे गरजेचे आहे या आशयाचे पत्र मान. मुख्यमंत्री, आदिवासी विकास मंत्री व महाराष्ट्र राज्यातील मानवी हक्क आयोगाचे अध्यक्ष श्री. बानुरमथ यांच्याकडे देण्यात आले होते. या गंभीर बाबीचा विचार करून शासनाने डॉ. सुभाष साळुंखे यांच्या अध्यक्षतेखाली तांत्रिक समिती नेमली होती. त्याबाबतचा अहवाल प्रसिद्ध करण्यात यावा.
- आश्रमशाळांमधून नळपाणी पुरवठा नादुरुस्त असून त्या योजना वेळेवर दुरुस्त होत नसल्याने प्रदीर्घ कालावधीपर्यंत निरुपयोगी असतात आणि मुलांना व विशेषत: मुलींना खूप अडचणींना तोंड द्यावे लागते तरी याबाबत लवकरात लवकर उपाययोजना करण्यात याव्यात.
- मुलींनाही नदीवर, ओढ्याच्या ठिकाणी उघड्यावर आंघोळ व शौचाला जावे लागते. जेवणात चपाती आणि भाज्यांचा सर्रास अभाव, अनेक ठिकाणी विजेअभावी अंधारात रहावे लागते, वसतिगृहातल्या घाणीच्या साम्राज्यामुळे मुलांना अनेक आजारांना तोंड द्यावे लागते. त्यामुळे या सर्व मूलभूत गोष्टी सुधारण्यासाठी केवळ सहा महिन्यात पूर्ण करून घेण्यासाठी कालबद्ध कार्यक्रम आखण्यात यावा.
- वर्ष २०१६-१७ या शैक्षणिक वर्षासाठी राज्यातील आदिवासी आश्रमशाळांमध्ये २ लाख विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या शालेय साहित्य, स्वेटर, बूट यापासून विद्यार्थ्यांना वंचित ठेवले गेले. यासंबंधीच्या ८७ कोटी रुपयाच्या निविदा गैरव्यवहार झाल्यामुळे रद्द करण्यात आल्या. रुपये ११८५/- ते रुपये २१५१/- इतका स्वेटरचा दर पात्र निविदांमध्ये होता. हा घोळ प्रसारमाध्यमांच्या लक्षात येताच या निविदा रद्द करण्यात आल्या. परिणामी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य, बूट, स्वेटर वेळेवर पोहोचलेच नाही. त्यामुळे यापुढे अशाप्रकारची अनियमितता पुन्हा होणार नाही यासाठी शासनाने कडक पाऊले उचलवीत.
- १९५३ मध्ये आश्रमशाळा निर्माण झाल्यापासून तेथील इमारतींची तसेच पदांची निर्मिती केली गेली होती. आज ६३ वर्षांनंतर सर्व नवीन व जुन्या आश्रमशाळांचा आढावा घेऊन पदांचा आकृतिबंध ठरवायला हवा व ती पदे भरायला हवीत.
- ६० पैकी एकाही आश्रमशाळेत संगणक शिक्षक नाहीत. काही ठिकाणी खाजगी संस्थांनी देणगी रुपात दिलेले संगणक आहेत. प्रत्येक आश्रमशाळेत प्रशिक्षित अशा संगणक शिक्षकांची पदे भरायला हवीत.
- तेल, साबण, गणवेश, बूट काहीही नाही. इतक्या वाईट स्थितीत शिक्षण घेणारा आदिवासी केवळ कायदा, योजना, पॅकेजेस आणि भाषण देऊन मुख्य प्रवाहात कसा येईल. त्याचाही विचार शासनाने करणे गरजेचे आहे.
- गणवेश, रेनकोट व स्वेटर हे वेळेवर मिळत नाही वा निकृष्ट दर्जाचे मिळतात. त्यामुळे या वस्तूंच्या रकमा धनादेशाच्या रुपाने योग्य कालावधीत पालकांच्या खात्यात भरण्यात याव्यात जेणे करून पालक बाजारातून त्या वस्तू खरेदी करू शकतील.
- विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी प्रत्येक आश्रमशाळेत दिवस-रात्र असे किमान दोन सुरक्षा रक्षक असणे गरजेचे आहे.

# पाहणी दौरा - सहभाग

कुपोषणामुळे वर्षभरात झालेले बालमृत्यू आणि आश्रमशाळा, वसतिगृहांमध्ये होणारी आदिवासी विद्यार्थ्यांची परवड या पार्श्वभूमीवर श्रमजीवी संघटना आणि समर्थन संस्थेने एकत्रितपणे एक पाहणी केली. दिनांक १७ ते २६ ऑक्टोबर दरम्यान झालेल्या या पाहणी दौऱ्यात पालघर जिल्ह्यातील मोखाडा, जव्हार, विक्रमगड, वाडा, पालघर, वसई, डहाणू आणि तलासरी या तालुक्यांमधील आश्रमशाळा, वसतिगृह, प्राथमिक आरोग्य केंद्र आणि अंगणवाड्या यांना प्रत्यक्ष भेटी देऊन वस्तुस्थिती जाणून घेण्याचा प्रयत्न केला. या पाहणी दौऱ्यात विवेकभाऊ पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली **विजय जाधव, सुरेश रेंजड, प्रमोद पवार, गणेश उंबरसाडा आणि दिनेश पवार** अशा पाच गटप्रमुख आणि त्यांचे सहकारी अशा पाच प्रमुख टीम तयार केल्या. विवेक भाऊ पंडित यांच्यासोबत या दौऱ्यात दत्तात्रेय कोळेकर, अशोक सापटे, ज्ञानेश्वर शिर्के यांचा सहभाग होता.

या पाहणी पथकात किसन चौरे, नारायण हसबंड, निलेश वाघ, उल्हास भानुशाली, महेश धांगडा, आशा चौधरी, अजित गायकवाड, मनोज काशीद, जगदीश काशीद, पूजा सुरुम, विलास मोरघा, रेणुका चौरे, सुरज पारधी, रोहित पाटील, विशाल घाटाल, मुन्नाभाई चव्हाण, पूजा काकड, स्नेहा साठे, शंकर वरखंडा, कान्हा पऱ्हाड, राहूल चौरे हे कार्यकर्ते पथकात सहभागी होते. सोबत जव्हार मध्ये कमलाकर भोर, संतोष धींडा, वसंत वाजे, प्रमिला महाला, जमशेद खान, गोविंद गावित, रघु चौधरी, रंजना चौधरी, तुळसा कोंगील, यमुना भोये, परशुराम गांगुडे, किशोर हुमने, शालीना चव्हाण, भास्कर पारधी, संतोष बीज, सुरेश बीज.

**विक्रमगड मधून** कैलास तुंबडा, लक्ष्मण पडवळे, रुपेश डोळे, गंगाराम वरठा, वसंत पवार, त्रिंबक मोरघा, सविता कासट, कृष्णा कासट, भोये काका, मंगेश काळे, विलास झोप, लवेश कासट, मधुकर खेवरा, भालचंद्र मोरधा, राजेंद्र भोये, कमलावती जाधव, बिपीन शेलार.

**वाडा तालुक्यातून** मिलिंद थुळे, सरिता जाधव, जानू मोहंडकर, रवी गरेल, गीता मोहंडकर, बाळू लहांगे, बाळा पाडोसा, सुनिल जाधव, रेखा पऱ्हाड, सुनील जाधव, भारत जाधव, राजू जाधव, कल्पेश जाधव, गणेश टोपले, सविता पाडेकर, नामदेव पवार, भाई खंडागळे, कैलास मेघवाले, अस्मिता पाडेकर, किशोर मढवी, जयराम बरफ, महेश जाधव.

**वसई तालुक्यातून** रामभाऊ वारणा, आत्माराम ठाकरे, नथुराम दुमाडा, दीपक चन्ने, दिगंबर पाटील, विनायक जाबर, संजीवनी सुरुंद, रेखा नानकर, एकनाथ कलिंगडा, बजरंग वळवी, यशवंत सायरे, लक्ष्मी वाघ, अंकुश तांबडी, दिनेश म्हात्रे, हेमंत बात्रा, प्रसाद वेंडगे, निलेश गोवारी, गुरुनाथ पिलाना, आशा तुंबडे, अरुणा मुकणे, रंजना बरफ, दिलीप लोंढे, अनंता वरठा, सत्येन किणी, रविंद्र गोवारी, नाना पाटील.

**पालघर मधून** किरण भोईर, किशोर सुकाड, मनोज कवळी, सुनिता गरेल, रेखा धांगडे, नरेश वरठा, पवन सवरा, सचिन डावरे, गितेश पारधी, दिलीप भोईर, विनोद तांडेल, मोहन तुंबडा, प्रताप गावित, नरेश पवार, संतोष भुयाळ, कृष्णा गिंभल, सुरेश बरडे, अमृत वड, कैलास कोल्हेकर, इश्वर बरड, नितिन सातवी, प्रमिला आडगा, अनंता आडगा.

**डहाणू मधून** सुभाष लहानगे, हरिचंद्र उंबरकर, अनेश सुतार, त्रिंबक लाहांगे, प्रकाश पिलेना, सत्येंद्र मातेरा, तुलशिराम पिलेना, किरण ताई दुमाडा, निलेश सपाटे, तुळशीराम पिलेना, योगेश लहांगे, केशु रतन पारधी, सदान पिलेना, सुरेश जाधव, जानू सवर, तुलजी बोन्बा.

**मोखाडा मधून** पांडुरंग मालक, गणेश माळी, रामदास जाधव, गंगाधर पाटील, किसन दिवे,रमेश दिघा.

**तलासरीत** भूपेश कर्वे, दिलीप गोतारणे, रत्नाकर पाटील.



















## सांगा कसं शिकायचं! विद्यार्थ्यांचा सवाल?

आदिवासी आश्रमशाळांची अवस्था दयनीय

वार्तापत्र



## आदिवासी विद्यार्थ्यांना इंग्रजीचे शिक्षण ठरली शिक्षा!



## वसतिगृह की कोंडवाडे?

विवेक पंडित यांनी विचारला प्रश्न